# श्री साईलीला



"कुत्र्याला नि डुकराला वाढलेल्या भाकरी मलाच पोचल्या." श्री साईबाबा

६० पैसे

१९७४

सप्टेंबर

# अनुक्रमणिका – सप्टेंबर १९७४


| | |
|---|---|
| १. संपादकीय | श्री गजानन तू गणराया |
| २. शेगावचे श्री गजानन महाराज | श्री साईनंद |
| ३. संध्या छाया भिववित हृदया | प्रा. सौ. शकुंतला भागवत, एम्. ए. |
| ४. श्री गजानन लीला | श्री गजानन देविदास कुलकर्णी |
| ५. फलज्योतिषाचा ओनामा | होरालंकार श्री. शं. वा. देवधर |
| ६. श्री साईनाथ चरित्र – चालू लेखमाला | श्री. र. श्री. पुजारी |
| ७. श्री. गोंदवलेकर महाराज व्यक्तिदर्शन | श्री. पु. मु. अत्रे |
| ८. श्री गजाननाची भूपाळी | श्री. शशिकांत पाळंदे |
| ९. शिरडीवृत्त – जुलै ११७४ | — |

जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्री साई वा क्सु धा

देणें नित्य श्रद्धेनें द्यावें । विनाश्रद्धा दिधलें न पावे ।
राजाज्ञे शास्त्राज्ञे भ्यावें । लज्जेनें द्यावें कांहीं तरी ॥ १४४ ॥
विवाहादि लोकाचार । तेथेंही देणें लागे अहेर ।
देऊनि राखावा मित्राचार । लोक व्यवहार – शिक्षाही ॥ १४५ ॥
बाबाही दकारें भक्तांप्रत । भक्तहितार्थ तेंचि मागत ।
करा दया दान व्हा दान्त । सौख्य अत्यंत लाधाल ॥ १४६ ॥
अदान्तत्वादि दोषत्रय । करावया हा त्रिदोषक्षय ।
हा एकाक्षर स्वल्प उपाय । शिष्यार्थ गुरुराय योजिती ॥ १४७ ॥
काम क्रोध लोभ । आत्मोन्नती लागीं अशुभ ।
तयांचा जय अति दुर्लभ । यदर्थ सुलभ उपाय हा ॥ १४८ ॥

श्रीसाईसच्चरित – अध्याय १४ वा

---


## श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५३ वे ] सप्टेंबर १९७४ [ अंक ६

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, एम्. ए. पी. एच्‌डी., रा. भा. प्रवीण
- श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्सी., एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक रु. ०–६० फक्त.

*

: कार्यालय :

" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.
पीन : ४०००१४ दूरध्वनी : ४४२१६१

**संपादकीय**

# गजानना तू गणराया

हिंदुंचे देव अगणित असले, तरी गण–नायक एकच, गजानन! गजानन गणपति हा जनसामान्यांचा देव आहे. त्याच्या स्वरूपातून विद्वानांना परब्रह्माचा साक्षात्कार होतो, तर 'मोरया तुझी सोंड वाकडी' म्हणण्यात पोरासोरांना आनंद होतो! ज्ञानेश्वरमाऊलींला गणपतीच्या ठायी वेदप्रतिपाद्य आत्मरूप दिसले, तर श्री समर्थांना केवळ दर्शनमात्रे मनकामना पुरविण्याचे त्याचें आगळे सामर्थ्य जाणवलें! श्रीशिवरायांच्या मराठी राज्याची मुहूर्तमेढ रोवली गेली, ती श्रीगजाननाची स्थापना करूनच! पेशव्यांनीं तर गणपतीच्या आश्रयानेच राज्यशकट चालविला! गणपति हा कालमानानुरूप चालणारा! देव आहे. अश्मयुगात तो स्वतःचाच मोडलेला दात हाती घेऊन त्याने लढला, लोहयुगात त्यानें परशु आणि अंकुश धारण केले, तर आता जेटयुगात तो 'धूम्रवर्ण' झाला आहे. कलियुगात त्याचे नाव आहे, धूम्रवर्ण! आजकाल आपण सगळे धूम्राच्याच छायेंत वावरत नाहीं काय? गणपति हा शेतकऱ्यांचा देव आहे. शेतीचे नुकसान करणाऱ्या उंदरावरच तो आरूढ झाला आहे. गणपति हा श्रमणाऱ्यांचा, कष्ट करणाऱ्यांचा देव आहे. तो कर्ता आहे, ब्रह्मवेत्ता आहे. तो विरक्त नाहीं, भोक्ता आहे! कलाकौशल्याचा उद्गाता आहे! रणांगणात तो नेता आहे, समाजात शास्ता आहे, आणि संकटग्रस्तांचा त्राता आहे! त्याला दूर्वा अतिप्रिय! दुर्वा भूमिव्यापिनी, निरंतर विस्तार पावणारी, वाढणारी अशी आहे! गणपति इतिहासाने सनातन असला, तरी मनोवृत्तीने सनातनी नाहीं! पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढणारें स्त्रियांचें सैन्य ह्या भारतवर्षात प्रथम स्थापन केलें, ते गणपतीनेंच! गणपति वृद्धांना आवडतो, तरुणांना मोहवितो, बालकांना रिझवतो! भारतातील लोक एकत्र बसलेले असले, तर त्यात 'गणपति बाप्पा मोरया' म्हटल्यावर जो प्रतिसाद देईल, तो मराठी माणूस असें बिनदिक्कत समजावे. इतका महाराष्ट्राचा आणि गणपतीचा घनिष्ट संबंध आहे. मराठी माणूस शिकू लागतो, तो श्रीगणेशायनमः म्हणून! कथा कीर्तनात गणपतीचे मंगलाचरण होतेच, पण तमाशाच्या फडातहि प्रथम वंदन होते गणेशालाच! महाराष्ट्रात गणपती इतके कौतुक दुसऱ्या कोणत्याहि देवताचें होत नाहीं. गणेशोत्सवासारखा थाटामाटात दुसरा कोणताहि उत्सव होत नाहीं! रेशनच्या दुकानापेक्षा, किंवा सिनेमागृहापेक्षांहि लांब रांगा गणपतीच्या मंदिरासमोर लागतात! महाराष्ट्राच्या असे हे आवडीचे दैवत अनेक अवतारांपैकीं आहे.

● ● ●

श्री साईबाबांचे समकालीन थोर संत

# शेगांवचे श्री गजानन महाराज

लेखक ● श्रीसाईनंद

महाराष्ट्रात श्री साईबाबांच्या शिरडीला भाविकांचें श्रद्धास्थान म्हणून जेवढें महत्त्व प्राप्त झालेले आहे, तेवढेच विदर्भातील श्री गजानन महाराजांच्या शेगांवलाहि महत्त्व आहे. दर गुरुवारीं शिरडीला जशी भाविकांची यात्रा भरते तशीच यात्रा शेगांव येथेहि भरत असते.

मध्य रेल्वेच्या मुंबई–कलकत्ता मार्गावर शेगांव हें एक रेल्वे स्टेशन आहे. मेल आणि एक्स्प्रेस सकट सर्व गाड्या या स्टेशनवर थांबतात. त्यामुळे श्रीजानन महाराजांच्या दर्शनाला येणाऱ्या भाविक जनांची फार मोठी सोय झाली आहे. तसे म्हटले तर शिरडीप्रमाणेच शेगांव येथेहि नित्य भाविक जनांची येजा सुरूच असते. परंतु गुरुवारीं विशेष गर्दीचें दृश्य बघावयास मिळतें.

शेगांव येथे श्रीगजानन महाराजांचें सुंदर मंदिर बांधलेले आहे. गावाच्या पूर्वेस शेवटच्या टोंकाला दोन एकर जमिनीच्या क्षेत्रफळात बांधलेल्या या सुंदर मंदिराचा देखावा भाविकांचे चित्त आकर्षून घेतो. श्री गजाननमहाराजांचे हे सुंदर मंदिर उत्तराभिमुख असून मंदिराचें प्रवेशद्वार भव्य तसेच कलात्मकहि आहे. याशिवाय वस्तीकडील भागाला म्हणजे पश्चिमेलाहि एक मोठे आणि आकर्षक प्रवेशद्वार आहे. मंदिराच्या मागील बाजूस लहानमोठ्या खोल्या काढलेल्या असून त्यांचा भाविक जनांना राहण्यासाठीं उपयोग होतो. या खोल्यांसमोर उंच ओटा असलेला व्हरांडा असून समारंभादिकासाठी या व्हरांड्याचा चांगला उपयोग होतो. मंदिराच्या पूर्व भागाला श्री नारायणमहाराज यांचें लहानसे समाधि–मंदिर आहे; एक मोठी विहीर आहे. श्री गजाननमहाराज संस्थानचें कार्यालय आहे. दक्षिणेकडील प्रवेशद्वारालगतहि एक विहीर असून उरलेल्या जागेंत व्हरांडा आहे.

## श्रीगजानन महाराजांचे समाधिस्थान जमिनीखाली भुयारात

१५ फूट खोल असून ११ × ११ च्या समाधिस्थानीं श्रीगजाननमहाराजांची शुभ्र संगमरवरी पाषाणाची २॥ फूट उंच मूर्ति बसविलेली आहे. ही मूर्ति नयनरम्य असून साक्षात् श्रीगजाननमहाराजच तेथे बसलेले असावेत असा क्षणभर भास झाल्यावाचून राहात नाहीं.

श्रीगजानन महाराजांच्या–भुयारात असलेल्या–समाधिस्थानावरच शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून बोट दाखविता येण्यासारखे श्रीराम मंदिर बांधलेले आहे.

या मंदिरातील राम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ति अत्यंत सुंदर असून त्या श्रीगजानन महाराजांच्या ह्यातीतच–त्यांनी दाखविलेल्या जागी उत्खनन केले असता सापडलेल्या आहेत. याशिवाय गणपति, अंबिकादेवी आणि जयविजय अशा आणखी तीन मूर्तीहि प्राचीन मूर्तिकलेचे सुंदर नमुने असून त्याहि उत्खननातच सापडलेल्या आहेत.

शेगांव येथील श्रीगजानन महाराजांचे हें मंदिर तसे फार जुने नाहीं. श्रीगजानन महाराज ह्यात असताना १९०७ साली श्रीरामाचे मंदिर बांधण्यास प्रारंभ झाला होता. त्यानंतर १९१० सालीं समाधिस्थ झाल्यानंतर १९१२ ते १९१४ सालच्या दरम्यान सदहू मंदिर बांधून पूर्ण झालें. परंतु अगदी अलीकडील काळात बांधलेले असूनहि हें मंदिर प्राचीन बांधणीच्या थाटाचें आहे.

## शेगांवला आगमन

१८७८ सालीं फेब्रुवारी महिन्याच्या २३ तारखेला श्री गजानन महाराजांचे शेगांव येथे अकस्मात आगमन झाले. परंतु ते कोण, कोठले, कोणत्या गावी, कुठल्या घराण्यात त्यांचा जन्म झाला; त्यांचे माता-पिता कोण याबाबत कोणालाहि कधीहि उलगडा करून घेता आलेला नाही. विशेष नवलाची गोष्ट अशी की, स्वतः महाराजांनीसुद्धा वरीलपैकी कुठलीच माहिती कधीच कोणाला सांगितली नाही किंवा एखाद्या वेळी सहज बोलता बोलता त्यांच्या तोंडून ती ऐकावयासहि मिळाली नाही.

शेगांव येथे श्री गजानन महाराजांचे आगमन झाले तेव्हा त्यांचे वय ३० ते ३२ वर्षांच्या दरम्यान असावे. सिद्धपुरुषाची सर्व लक्षणे त्यांच्या ठायी त्यावेळी विकसित झालेली होती.

असा सिद्ध-पुरुष जर दुसऱ्या एखाद्या ठिकाणाहून शेगांवीं आला असता तर त्या ठिकाणचे लोक त्यांच्या तपासाला आले असते. पण तसे काहीसुद्धां घडले नाही. शेगांवी आगमन होण्यापूर्वी गजानन महाराजांना कोणी कोठे पाहिल्याचेसुद्धा सांगितलेले नाही. त्यामुळे महाराजांचे शेगांवी आगमन हाच एक मोठा चमत्कार मानला जातो आणि ते सिद्धावस्थेंत आल्यानंतर एकदमच शेगांवी प्रगटले असा सर्वसाधारण समज आहे.

परंतु हा भावनात्मक भाग वगळला तर दुसरा एक समज असाहि आहे कीं, १८५७ च्या बंडानंतर पेशव्यांचे पुण्याहून परांगदा झालेले वंशज विदर्भातील पोपटखेडा या सातपुड्याच्या पायथ्याशीं असलेल्या खेडेगावी अज्ञातवास धारण करून राहात होते. पेशव्यांच्या या परांगदा वंशजाबरोबर आलेल्या अनेक बंडखोरांपैकीच श्रीगजाननमहाराज एक असावेत आणि त्यांनी आपल्या कायम वास्तव्यासाठी शेगांव हें स्थान निवडलें असावें. १९०७ सालीं लोकमान्य टिळक अकोला येथें आले असताना आजच्या अकोल्याच्या टिळक मैदानावर जी प्रचंड जाहीर सभा भरली त्या सभेला श्रीगजाननमहाराज हे जातीनें उपस्थित होते, इतकेंच नव्हे तर व्यासपीठावर टिळकांच्या शेजारीं बसले होते. त्यामुळे वरील समजाला पुष्टि मिळते आणि



सद्गुरु श्री गजानन महाराज शेगांव

श्री गजानन महाराज हे एकाकाळीं कुणीतरी राजकीय पुरुष होते आणि योग सामर्थ्यामुळे पुढे ते संत अथवा अवलिया म्हणून प्रसिद्धीस आले असे मानावयास पुष्कळच जागा निर्माण होते.

## टिळकांना प्रसाद

विदर्भातील टिळकांचे समकालीन, कै. दादासाहेब खापर्डे, हे सुद्धां श्रीगजानन-महाराजांना खूप मानीत असत. टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखालीं शिक्षा ठोठावण्यात आल्यानंतर कै. दादासाहेब खापर्डे आणि त्यांचे काही मित्र श्रीगजानन महाराजांकडे गेले आणि लोकमान्य टिळकांसारख्या नेत्याची राष्ट्राला सध्या फार गरज असल्यामुळे त्यांची सुटका होईल असे काहीतरी करा अशी त्यांनीं महाराजांची विनवणी केली. तेव्हा "माझा हा प्रसाद टिळकांपर्यंत पोंचवा" असे सांगून श्रीगजानन महाराजांनीं दोन भाकरी कै. खापर्डे यांच्या स्वाधीन केल्या आणि म्हटले, "टिळक तुरुंगात राहिल्याने देशाचे नुकसान न होता फार मोठा फायदाच झाला तर होईल हें लक्षात ठेवा !"

असे सांगतात कीं, हा भाकरीचा प्रसाद कै. खापर्ड्यांनीं खरोखरच टिळकांपर्यंत पोचविला होता आणि लोकमान्य टिळकांनीहि मोठ्या भक्तिभावाने त्याचे सेवन केलें होते.

टिळकांच्या काळात तुरुंगवास हा माणसाच्या प्रतिष्ठेला फार मोठा कलंक समजला जात असे. तुरुंगात जाणे हे हीनपणाचे लक्षण समजले जात असे. तुरुंगात जाऊन आलेल्या व्यक्तीस वाळीत टाकणे किंवा त्याला पंचगव्य प्राशन करावयास लावून प्रायश्चित देणें यासारखेहि प्रकार त्यावेळच्या समाजजीवनात प्रचलित होते. परंतु टिळकांसारखी थोर व्यक्ति तुरुंगात राहिल्यामुळे तुरुंगवास ( मग तो कोणत्याही कारणास्तव घडो ) अयोग्य समजले जाई पण यानंतर सत्कार्यार्थ, देशाप्रीत्यर्थ तुरुंगवास पत्करण्यात अनिष्ट असे काही नसून ते एक भूषण होय अशी भावना समाजात रुजली गेली. लोकमान्य टिळकांच्या तुरुंगवासामुळे देशाचा हा एक फार मोठा फायदा झाला आणि त्याचबरोबर 'गीतारहस्या' सारखा ग्रंथहि तुरुंगात असतानाच लिहिला गेला हा दुसरा मोठा फायदा. श्री गजानन महाराजांनीं कै. खापर्डे यांना जें सांगितलें तें भाकित शेवटीं अशा तऱ्हेनें सत्य ठरले, असे मानावयास हरकत नाहीं.

## काही चमत्कार

शेगांव येथें श्रीगजाननमहाराजांनी शेकडों चमत्कार दाखवून लोकाना थक्क केलें. त्यामुळें त्यांचा भक्तवर्ग मोठ्या प्रमाणावर वाढत गेला. नुसत्या हस्तस्पर्शानें त्यांनी महारोगी बरा केला. कोरड्या ठणठणीत विहिरीला पाण्यानें तुडुंब भरून दाखविलें, स्वतःचा पलंग पेटवून, त्यावर स्वस्थपणे बसून अग्नि हा आपल्याला जाळू शकत नाहीं हे ब्रह्मगिरी नावाच्या एका ढोंगी संताला दाखवून दिले आणि त्याला परोपकाराचा सन्मार्ग दाखविला, इतकेच नव्हे तर आगगाडीसुद्धा आपल्या आज्ञेशिवाय त्यानीं पुढे जावू दिली नाहीं. त्यांच्या या अनेकानेक चमत्कारांचें समग्र वर्णन त्यांच्या पोथीत देण्यात आलेले आहे.

अध्यात्मिक ज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत श्रेष्ठ पातळीवर विराजमान झालेला एक थोर योगी पुरुष या दृष्टीनें वरिष्ठ श्रेणीतील लोक श्रीगजानन महाराजांविषयीं श्रद्धा बाळगीत. या उलट भोळे भाबडे:श्रद्धावान लोक त्यांना एक पोचलेला 'अवलिया' मानीत.

श्रीगजानन महाराज रोज अंगावर वस्त्रे बहुधा ठेवीत नसत. कोणी बळेच घातले तरी जरा वेळाने काढून फेकीत असत. सदैव नग्नावस्थेत राहाणेच ते अधिक पसंत करीत. खाण्यापिण्याचीसुद्धां त्यांना सहसा चिंता नसे. कुणी काहीं खायला आणून दिलें तर त्यातले चार घास अवश्य खात असत.

श्रीगजानन महाराजांना चिलिम ओढण्याचा विलक्षण नाद होता. ते नेहमीं चिलीम ओढण्यात मग्न असत. पशुपक्षांचा त्यांना फार लळा होता. ते रामाचे भक्त होते. त्यामुळे वानरावर त्यांचें प्रेम विशेष असे कुत्री त्यांच्या नेहमी आसपास वावरत असत. पक्ष्यांपैकीं मोर आणि कबुतरे त्यांना विशेष आवडत. वानराशीं खोड्या करण्यात आणि मोर-कबुतरांशीं क्रीडा करण्यात ते जणू स्वतःला विसरून जात.

श्री गजानन महाराज हे 'अवलिया' याच सदरात मोडण्यासारखे वर्तन करीत. परंतु अनेकदा लहरीत आले म्हणजे मात्र एखाद्या महान तत्त्ववेत्त्याच्या तोंडी शोभणारे भाष्य करीत. वेदाच्या ऋचा ते स्वरसहित म्हणत. त्यावरून ते एखाद्या उच्च ब्राह्मण-कुलात जन्मलेले असावेत असाहि कित्येकजण तर्क करीत.

श्री गजानन महाराजांचे शिष्य बनावे अशा अभिलाषेनें अनेकजण त्यांच्याजवळ राहात; त्यांची सेवाचाकरी करीत; पण त्यांनी कोणालाहि शिष्य बनविले नाहीं. कोण गुरु अन् कोण चेला ! ज्याने त्याने आपले पहावे असे ते म्हणत असत.

## समाधि व नंतर

शेगांवीं प्रथम ते बंकटलाल नावाच्या एका गृहस्थाच्या घरी राहिले. नंतर भास्कर पाटील, हरी कुकाजी पाटील, सुखदेव नारायण पाटील आणि पुंडलिक रामचंद्र पाटील हे श्री गजानन महाराजांचे निस्सीम भक्त बनले आणि त्यांच्याचकडे महाराजांचे वास्तव्य राहिलें. शेगांवच्या सतत ३५ वर्षांच्या वास्तव्यानंतर आपला समाधिस्थ होण्याचा दिवस आपल्या भक्तजनांना आधींच सांगून ठेवून ता. ८ सप्टेंबर १९१० रोजीं म्हणजे भाद्रपद शुद्ध पंचमीला त्यांनीं आपला देह ठेवला. परंतु त्यांचा कीर्तिध्वज मात्र त्यांनी स्वतःच बांधावयास लावलेल्या मंदिराच्या सुवर्ण कळसावरील ध्वजाप्रमाणेच अखंड फडफडत राहिला आहे. सुशिक्षित-अशिक्षित, गरीब-श्रीमंत, तरुण-वृद्ध मिळून बरेच आजहि श्री गजानन महाराजांचे स्थायी नितांत श्रद्धा बाळगून आहेत. त्यांचेविषयीं श्रद्धा बाळगणाऱ्या भाविकजनांच्या संख्येंत प्रचंड प्रमाणावर वाढ होत आहे.

श्री गजानन महाराजांच्या भक्तांची अफाट संख्या हेंच श्री गजानन महाराज संस्थानच्या भरभराटीचे कारण होय. हें संस्थान १९५२ च्या पब्लिक ट्रस्ट ॲक्टअन्वयें रजिस्टर्ड झालेलें असून एकूण १२ ट्रस्टी संस्थानचा संपूर्ण कारभार

( पुढील मजकूर पान १६ वर पहा )

# "संध्या छाया भिववित हृदया...."

• प्रा. सौ. शकुंतला भागवत

"काय ओळखलंस का ? – नमाच ना तू ?"

मी एकदम थबकले. माझ्याशी बोलणाऱ्या त्या बाईच्याकडे निरखून पाहू लागले.

चेहरा ओळखीचा वाटत आहे. पण नक्की आठवेना. मग उगीचच हसल्यासारखे करून मी म्हटले—"हो चेहरा ओळखीचा वाटत आहे. पण नाव काही लक्षात येत नाही. माफ करा हं.!"

कितीतरी गावं हिंडले मी. तेव्हा या नक्की कोणत्या गावच्या ? नक्की कोण ह्या ? आज आपल्याला असं एकेरी नावानं संबोधणार कोण असणार ? बहुधा माझ्या माहेरच्या नात्यातलं...माझ्या एखाद्या मैत्रिणीची आई...त्या क्षणी एकदम आठवलं.

"विजूच्या आई ना तुम्ही !" मी एकदम ओळख पटून म्हटलं.

मी त्याना ओळखल्याचं पाहून त्यांचा चेहेरा प्रसन्न झाला. कितीतरी म्हणजे चांगल्या १५/२० वर्षांनी आम्ही भेटत होतो.

१५/२० वर्षांपूर्वीच्या विजूच्या आई आठवल्या. किती देखणेपण होतं. केवढा उत्साह ! केवढे तेज होते त्यांच्या चेहेऱ्यावर ! आणि आज ! सुरकुतलेला चेहेरा. चालीत आलेला संथपणा, अधून मधून डोकावणारे पांढरे केस ! विजूच्या आई पार बदलल्या होत्या. मी निरखून पहात म्हटलं, "बराच बदल झालाय् तुमच्यात. त्यामुळे ओळखलं नाही हो तुम्हाला."

"हो व्हायचाच. आता म्हातारी व्हायला लागले मी !" त्यांच्याच तोंडून 'म्हातारी' शब्द आला. मी माझ्या ओठावरून तो परतवला होता. हो उगीच त्यांच्या भावना दुखवायला नकोत. म्हातारा – म्हातारी म्हटलं की आतून टोचणी लागल्यासारखं होतं.

मग उगीचच जुजबी चौकशी झाली. विजू कोठे असते ? तिला मुलं किती ? मला मुलं किती ? येथे येऊन किती दिवस झाले ... इत्यादी.

"माझ्यात मात्र अजून फारसा फरक पडलेला नाही" इत्यादी म्हणत आम्ही एकमेकीचा निरोप घेतला. "मी अजून चाळीशी ओलांडली नाही फरक पडत जायला..." मी मनाशीच म्हणाले.

गेल्यावर्षी असेच आमच्या कॉलेजमधील एक प्रोफेसर भेटले होते. स्मृतींची मनोहर मालिका हळूवारपणे उलगडली गेली होती पण मी कॉलेज मध्ये असतानाचे 'सर' आणि आताचे 'सर' असेच बदलल्यासारखे जाणवले होते. आता सर

थकल्यासारखे दिसत होते. तोंडात दात नव्हते. आता कवळी बसवणार आहे" म्हणाले होते. त्यांचे येणारे अस्पष्ट उच्चार कसेतरीच वाटले होते. खोल गेलेले डोळे आणि त्या भोवतालची ती काळी वर्तुळं!

" सर, फार बदल झाला आहे तुमच्यात. मी ओळखलंच नाही ..." असे म्हणताच सर म्हणाले होते –" चालायचंच. संपत आलं आहे –" त्यावर मी म्हटलं होतं. —

" असं नाही काही सर, अजून कितीतरी दिवस काम करायचं आहे तुम्हाला. तुमच्या लिखाणाकडे लक्ष ठेवून असंख्य वाचक ताटकळत बसले आहेत."

मी हळूवार हाताने फुंकर घातली. पण मला एकदम वाटले – सगळेजण कसे बदलल्या सारखे वाटत आहेत.

२०/२५ वर्षांपूर्वीचा तजेला, उत्साह, डौल एकदम जातो तरी कोठे ? पन्नाशी ओलांडली की माणूस पार बदलतो. उगीच नाही ५८ वर्षांनंतर सेवानिवृत्त व्हावं लागत ! मी मनाशी म्हटलं " मृत्यूची घंटा आहे ही ! Warning bell ! ! "

विजूच्या आई, आपले सर यांच्यातला फरक जाणवताच मला माझे धाकटे काका आठवले. यंदा सेवानिवृत्त होणार होते ते ! केवढे मोठे सरकारी अधिकारी ! पण उद्या हातची सत्ता जाणार ! हा जोम, उत्साह, सारं नाहीसं होणार !

आणि माझं काय ? मीही अजून १०-१२ वर्षांनीं याच मार्गाला लागणार ! आणि मीही अशीच दिसेन ! या विचाराबरोबर माझे अंग शहारले. वार्धक्याच्या नामोच्चाराबरोबर माझ्या अंगावर शहारे आले. " संध्या छाया भिववित – हृदया..." सांज ही हुरहुरायला लावणारी ! मन सैरभैर भटकायला निघालं—

" आज इतका तजेलदार गोंडस दिसणारा आपला चेहेरा असाच सुरकुतणार म्हटल्याबरोबर कससंच वाटलं. – हे गोजिरवाणे गोलाकार गोंडस लोमस हात सोन्या-मोत्याच्या अलंकारानी कसे खुलून दिसत आहेत. पण तेही असेच शिथिल–तेजहीन होणार ! त्यावर बेढबपणे तरारून उठलेल्या शिरा दिसणार. आज पाणीदार वाटणार डोळे उद्या कळाहीन निस्तेज खोबणीतले खडे दिसणार ! मोत्यासारख्या चमकदार दातांची ही शान हरपणार. आणि तेथे उरणार ते केवळ एक दंतहीन बोळकं ! मग खायचे कसे ? चावून चावून आस्वाद घ्यायचा कसा ? पदार्थाची माधुरी चाखायची कशी ?

त्याहीपेक्षा हे ताठ शरीर वाकणार. धीमेपणाने एकेक पाऊल जड जड पडणार ! आधाराला हाती काठी घ्यावी लागणार आणि मग साहाजिकच जीव लाचार होणार ! लाचारीने मदतीकरिता हात पसरावा लागणार ! या कल्पनेनेच अंग शहारले.

वाटले " कृतान्तकटकामलध्वजजरा " दिसू लागताच माणसाला केवढा हादरा बसत असेल. मला शेजारचे अप्पा आठवले.

तोंडातून लाळ गळत आहे. पण ती पुसायला हात झटकन वर जात नाही. म्हणून कापत कापत–कापऱ्या आवाजात मारलेली हाक—

" अरे जगू, सुनीता...अरे कोणी आहे का रे तिकडे... ? "

आणि ते ऐकताच त्रासिक स्वरात " गप्प बसा आता, हाक मारू नका सारखी! कोण आहे रिकामे येथे!"—असे आलेले उत्तर ...

छे! छे! एके काळी केवळ दर्दभरी हाकेसरशी धावून येणारी शब्द झेलायला तत्पर असलेली असंख्य माणसे–आज असंच बोलतात.

अप्पा म्हणजे एक रिटायर्ड लेफ्टनंट कर्नल! शिस्तीचा भोक्ता; करडा; हिंमतवान! मूर्तिमंत सिंह! पण अप्पा, अप्पा, काय आज ही दशा!

मला ज्ञानेश्वरी आठवली. त्यातला तेरावा अध्याय आठवला.

आजिचा अवसरी पुष्टी जे शरीरी।
ते पाहे होईल काचरी वाळली जैसी ॥

तारुण्यातलीं ही पुष्टी उद्या वाळलेल्या काचरीसारखी होईल. हातापायाच्या सामर्थ्याला ओहोटी लागून ते थकतील. फुलातील सुगंध घेण्यास उत्सुक असलेले नाक उंटाच्या गुढघ्यासारखे होईल.

पद्मदलेसी रसाळे। मांडताती जे हे डोळे। ते हे होती पडवळे। पिकली जैसी॥

कमळाच्या पोकळीशी स्पर्धेने भांडणारे हे डोळे म्हातारपणात पिकलेल्या पडवळासारखे होतील. भिवईचे पडदे झाडाच्या जुन्या सालीप्रमाणे खाली लोंबतील व अश्रूंच्या पाण्याने ऊर कुजेल.

ज्या मुखाचे ओठ तारुण्यात विड्याने रंगवितात व ज्यातील दात हसताना दाखविले जातात, ज्या मुखाने सुंदर बोलले जाते–त्याच तोंडाला उद्या म्हातारपणी कफाचा लोंढा येईल. दाढा दातासकट उखडुन जातील. जीभ उठणार नाही. वाणीला बोलण्याचे सामर्थ्य रहाणार नाही. कानाची कवाडे बंद होतील. हे शरीर –" पिंड गरूवा माकडु होईल –" माकडासारखे होईल, सर्वांगाला कापरे भरेल, पायात पाय अडकतील हात, वाकडे पडतील. इतर लोक आपल्या मरणाकरिता नवस करतील.

" सोयरिया उबगु येईल माझा।" सर्वांना माझा उबग येईल. " स्त्रिया म्हणती विवसी। बाळे जाती मूर्च्छी। किंबहुना चिळसी पात्र होईन –" स्त्रिया मला पिशाच्च म्हणतील, लहान मुले भिऊन मूर्च्छित होतील! सर्वांच्या किळसेला पात्र होईन! आणि दैवहिताच्या आंतबट्याच्या उद्योगाप्रमाणे शरीराची अवस्था होईल. " निदैव्याचे व्यवसाय। तैसे ठाकती हातपाय अमंत्रिया राज्याची परी आहे। बळा यया" आणि त्यामुळे प्रधान नसलेल्या राज्यासारखी दुबळी अवस्था होणार!

असे वर्णन ज्ञानेश्वराने केले आहे. म्हातारपणीच्या या किळसवाण्या वर्णनाबद्दल टीकाकार म्हणतात " ज्ञानेश्वराने इतके किळसवाणे वर्णन करायला नको होते."

पण खरा ज्ञानी तारुण्यातच वार्धक्याची जाण ठेवतो हे सांगण्यासाठी ज्ञानेश्वराने

वार्धक्याचे हे यथार्थ वर्णन घडविले आहे. ज्ञानदेव हा द्रष्टा होता. प्रत्यक्ष जीवनाचे सम्यक दर्शन घडविण्यात तरबेज असलेल्या या महान तत्त्वचिंतकाला 'म्हातारपणीचे दिवस' असेच दिसले. ह्या वर्णनाअखेरी ज्ञानेश्वराने म्हटले आहे.

"ही अवस्था येण्यापूर्वीच – बहिरेपणा येण्यापूर्वी ऐकण्यास योग्य ते ऐकून घेतो, पांगळे झालो नाही तोपर्यंत देवस्थाने, तीर्थे-पर्यटने करतो, दृष्टीचे सामर्थ्य असेपर्यंत पहायचे ते सर्व पाहून घेतो. हात लुळे पडण्यापूर्वी दान करून घेतो त्याचप्रमाणे

'नाना रोग। पडिघाती, पुढां आंग तंव आरोग्याचे उपेग करूनि घाली'—

पुढे नाना रोग उद्भवतील. तत्पूर्वीच आरोग्याचा उपयोग करून घेतो. तोच ज्ञानी होय. या वार्धक्याइतकं दुःख नाही. म्हणून तारुण्यात वार्धक्याची चाहूल घेणारा तो खरा ज्ञानी! ज्ञानेश्वराने वार्धक्याचा इशारा देऊन ठेवला आहे.

तो ज्ञानदेव केवढा थोर! मी मनोमनी उगीचच गहिंवरले.

माझे विचारचक्र फिरू लागले. माझी मोठी मावशी, मामा, चुलते, सासूबाई... अशीच थकलेली दिसतात नाही हल्ली! किती क्षणभंगूर आहे हे जीवन! हे शरीर!! हे रूप, हे लावण्य, हा जोस!! हे सारं एका दशकानंतर किंवा तपानंतर ओसरू लागणार! चाळीशीच्या पलिकडे कललं की जणूं पतन प्रारंभ!

मला 'बी' कवींच्या ओळी आठवल्या —

"पूर्णोत्थापन काल तोच पतन प्रारंभही होतसे
ऐसा निष्ठूर कायदा सकल या सृष्टीस शासितसे" —

पण आपल्या या गोंडस रूपाचं असं हिडीस चित्र डोळ्यांपुढे तरळताच एक कल्पना तरंगली.

'हे होणे नाही!' ते कसं शक्य आहे? आपलं असलं रुपडं कोणाच्याही स्मरणात रहाता कामा नये. ही ओंगळ प्रतिमा निर्माणच होता कामा नये. यासाठी 'ते' येण्यापूर्वीच, ते चित्र अवतरण्यापूर्वीच या जगाचा निरोप घ्यायचा, म्हणजे लोकांच्या स्मरणात जे रुप कोरले जाईल ते हे लोभसवाणेच!

"यासाठी इच्छा मरण यावे" मी देवाची प्रार्थना करू लागले.

माणूस किर्ती-शिखरावर असतानाच, तो हवा हवासा असतानाच मृत्यू येवू दे. म्हणजे त्याचे ते म्हातारपणीचे 'विडंबन' पहाणे नको असे भाग्यवंत मला आठवले —

डॉ. भाभा, डॉ. विक्रम साराभाई, कुसुमावती देशपांडे, मीना पेठे, बालकवी, माधव ज्युलियन...आणि मनोमनी म्हटले-देवा, मलाहि म्हातारपण येण्यापूर्वीच मृत्यू येऊ दे. माझं ते किळसवाणं ओंगळवाणं रुपडं कोणाच्याही स्मरणातसुद्धा रहायला नको. पण याला भाग्य हवं. इहलोकीची यात्रा संपवायची म्हटल्याबरोबर संपविली जाणं, यासारखं महत् सुख कोणते? – सर्व इंद्रिये कार्यक्षम असताना, लोकाना आपण

हवे हवेसे वाटत असताना मृत्यूला सामोरे जाण्याचे भाग्य ज्या भाग्यवंतांना लाभते ते खरेच थोर होत. पुण्यात्मे होत.

मला उतरणीकडे कळल्यावर

'संध्याछाया भिववीत हृदया' म्हणणारे कविवर्य तांबे आठवले. तृतीचा घोट ओठाशी लावून घट भरभरून रसिकांना मधु पाजणाऱ्या कविवर्यांची मृत्यूला सामोरे जाण्याची कल्पना आठवली. मीही मनोमनी हात जोडले आणि त्या मनाला समजावले.

'मना वृथा कां भिशी मरणा
दार सुखाचे ते हरि करुणा
आई पाही वाट रे मना,
पसरोनी बाहु कवळण्या उरी

मृत्यू म्हणजे माऊलीला प्रेमभराने भेटावे त्याप्रमाणे हरीशी होणारी ही भेट आहे. त्याची भीती कशाला ? मृत्यो, तू ये !

या वार्धक्यावर मात करण्यासाठी तू ये ! ये ! तू मृत्यो ये !!

# श्रीगजानन महाराज लीला

गजानन संता
नमितो मी तुला
तुझ्या गायनाला
स्फूर्ति देई ॥ १ ॥

देविदासा द्वारी
शेगावचा संत
ना पूर्व वृत्तांत
अवतरे ॥ २ ॥

मुखी "गणगण
गणात बोते" हे
वचने नाम हे
गजानन ॥ ३ ॥

गोविंदबुवांच्या
किर्तनी बैसला
शिष्याला दाविला
चमत्कार ॥ ४ ॥

व्यंकटाच्या घरी
होते गजानन
त्यांच्या कृपे जन
धन्य झाले ॥ ५ ॥

गोसाव्याने केला
पुरा हो नवस
गांजा प्यावयास
दिला संता ॥ ६ ॥

गजाच्या पायाच्या
तिर्थे जानराव
मृत्यूचाही राव
जाहला हो ॥ ७ ॥

घाटोळास मार
ढोंगीपणापायां
गजानन देई
शिक्षा तया ॥ ८ ॥

चिलीम पेटली
काडी न जळाली
सोनारास आली
प्रचितीही ॥ ९ ॥

त्याचे चिंचवण
किड्यांनी भरले
पूर्ववत केले
शरणांती ॥ १० ॥

चंदू मुकिंदाचे
महिन्याचे शिळे
कान्होले भक्षिले
गजानने ॥ ११ ॥

माधवास दिली
सदाचीच मुक्ति
मुक्त भक्ताप्रती
करी गजा ॥ १२ ॥

योग्यसे ब्राह्मण
नसता मुळीही
वसंत पुजाही
करविली ॥ १३ ॥

त्याच्यासाठी आले
ब्राह्मण वेळीच
झाले चकितच
सारेजण ॥ १४ ॥

कोरडी विहिर
भरली पाण्याने
अकोली तयाने
धन्य केली ॥ १५ ॥

गांधील माश्यांचे
सोसले चावणे
अगाध ते जिणे
गजाचे त्या ॥ १६ ॥

वज्रभुषणासी
देवून दर्शन
तयास पावन
करी गजा ॥ १७ ॥

हरी पाटलाला
हरविले बळे
तेणे त्याचे चाळे
बंद झाले ॥ १८ ॥

ऊसाच्या माराने
काहीही न झाले
ऊस ते पिळले
रसासाठी ॥ १९ ॥

खंडू पाटलास
दिले पुत्ररत्न
गजा हो प्रसन्न
भक्तालागी ॥ २० ॥

खंडू पाटलाला
निर्दोष सोडीला
गजानेच दिला
खरा न्याय ॥ २१ ॥

तेलंगी ब्राह्मणा
वेद शिकवीले
आणि ज्ञात केले
गजानने ॥ २२ ॥

गोसाव्यांचा गर्व
करून हरण
वृथा अभिमान
दूर केला ॥ २३ ॥

जळत्या पलंगी
बसे गजानन
अग्नि नारायण
शांत झाला ॥ २४ ॥

द्वाड घोडा केला
गजानने शांत
गांजा खूण देत
नवसासी ॥ २५ ॥

दास नवमीस
गेले बाळापूरी
बाळकृष्णा घरी
तोषविले ॥ २६ ॥

गजाने छत्रीने
बाळाला मारले
आशीर्वाद दिले
परिक्षांती ॥ २७ ॥

द्वाड गाय होती
सुकलालापाशी
गजाने तिजशी
शांत केले ॥ २८ ॥

पथ्य आंब्याचेच
प्रसाद आंब्यांचा
तेणे लक्ष्मणाचा
रोग गेला ॥ २९ ॥

धुड्याच्या भक्तीच्या
दांभीकपणाला
वाव नाही दिला
गजानने ॥ ३० ॥

सतीच्या शेजारी
द्वारकेश्वराशी
भास्कर देहाशी
ठेवियला ॥ ३१ ॥

गजानने आज्ञा
केली कावळ्यांना
येथे यायचे ना
तुम्ही आता ॥ ३२ ॥

विहिरीत मोठा
सुरूंग उडाला
गणु जवाऱ्याला
वाचविले ॥ ३३ ॥

निरिच्छपणाची
मूर्ति गजानन
शेटजी पावन
झाले तेणे ॥ ३४ ॥

गजानन कृपा
पितांबरयासी
वठल्या आंब्याला
पाने आली ॥ ३५ ॥

श्यामसिंगाप्रती
दिसे चमत्कार
गजाज्ञेने दूर
जाती मेघ ॥ ३६ ॥

पुंडलीका आली
गाठ ती प्लेगाची
कृपा त्या गजाची
निमाली ती ॥ ३७ ॥

गंगा भारतीचा
गेला महारोग
संपला तो भोग
गजा कृपा ॥ ३८ ॥

गजाच्या कृपेने
बंडूस मिळाले
धन गाडलेले
भाग्यवंता ॥ ३९ ॥

बुडत्या नौकेला
गजाच्या कृपेने
नर्मदा माईने
तारीयले ॥ ४० ॥

भाकरी प्रसाद
टिळकांना दिला
तेणे त्यांना झाला
महा लाभ ॥ ४१ ॥

पुंडलीकाप्रती
दिल्यात पादुका
स्वप्न सत्य देखा
केले त्यांनी ॥ ४२ ॥

त्र्यंबका हातचे
खावया थांबले
गजानन भले
त्रैप्रहर ॥ ४३ ॥

बंदूकीचा छर्रा
तुकारामा कानी
तो गजाननांनी
काढीयला ॥ ४४ ॥

नग्नपणापायी
जाहला खटला
पोलीसाला आला
प्रत्यंतर ॥ ४५ ॥

शहा यौवन तो
होता त्यांचा भक्त
भोजना सोबत
नेले तया ॥ ४६ ॥

पंजाबात त्याला
पाठवून दिले

करण्यास भले
कार्य महा ॥ ४७ ॥
बापूराव पत्नी
भानामती ग्रस्त
तिला करी मुक्त
गजानन ॥ ४८ ॥
आकोट गावात
गंगा स्नान केले
पावन ते झाले
सर्व लोक ॥ ४९ ॥
गजानन कृपा
बायजेच्यावर
जनाबाई थोर
जणु दुजी ॥ ५० ॥
कवर डॉक्टर
होता फोडग्रस्त
निवारी समस्त
गजानन ॥ ५१ ॥
पंढरपुराला
बापूना काळ्याला
विठ्ठल दाविला
स्वरुपात ॥ ५२ ॥
वारकरी होता
मरीने आजारी
त्यास बरे करी
गजानन ॥ ५३ ॥
पुन्हा प्राण दिला
मेलेल्या कुत्र्याला
दिला ब्राह्मणाला
प्रत्यंतर ॥ ५४ ॥
बुटी श्रीमंत ते
होते नागपूरी
गजा त्यांच्या घरी
राहिला ना ॥ ५५ ॥

गाढवांपासून
खळयास रक्षिले
गजानन झाले
राखणारे ॥ ५६ ॥
गजाननालागी
मोर नारायण
तेणे तो मरण
पावलासे ॥ ५७ ॥
जाखड्याचे लग्न
केले गजाननें
निमोणकराने
पाहिले त्या ॥ ५८ ॥
गजानन कृपे
पुत्र लाभ झाला
तुकया भक्ताला
खरोखरी ॥ ५९ ॥
त्याचा हा नवस
अर्पिले पुत्रास
गजानने त्यास
ज्ञात केले ॥ ६० ॥
गजानन गेले
पंढरपुराला
आले विठ्ठलाला
विचारून ॥ ६१ ॥
झाले समाधिस्त
ऋषी पंचमीला
अवतार झाला
श्रीहरीचा ॥ ६२ ॥
कोठाडेची पत्नी
भक्ति आड आली
स्वप्नात पाहिली
गजानना ॥ ६३ ॥
जंजाळाची भेट
बोरीबंदरात

गजानन देत
आशीर्वाद ॥ ६४ ॥
गजाननावर
मार्तंडाची भक्ति
तेणे ते तरती
निसंशय ॥ ६५ ॥
यादवास दिले
वर्ध्यास दर्शन
चिंता ती हरण
केली त्याची ॥ ६६ ॥
भाऊ राजाराम
प्रसाद न घेई
तेणे तो न जाई
तेल्हाऱ्याला ॥ ६७ ॥
अगाध महिमा
असे प्रसादाचा
सर्वदा तयाचा
मान राखा ॥ ६८ ॥
मरणाच्या दारी
रतनसा सुत
गजानना प्रत
भार ठेवी ॥ ६९ ॥
तेणे पुत्र झाला
तयाचा चांगला
गजानन लीला
अगाधसे ॥ ७० ॥
होता रोगग्रस्त
चंद्रभागाबाई
तिर्थ‌अंगारा खाई
भक्ती भावे ॥ ७१ ॥
तेणे ती जाहली
पूर्ण रोगमुक्त
गजानन मुक्त
करी भक्ता ॥ ७२ ॥

वेडी ती जानकी
फिरे समाधीला
आराम पडला
तेणे तिला ॥ ७३ ॥
तीस फूटाहून
पडला मजूर
बांधता मंदिर
गजाचे त्या ॥ ७४ ॥
संत गजानने
त्यास सावरीले
म्हणून वाचले
प्राण त्याचे ॥ ७५ ॥
पाषाणाचा खांब
पडे बाई देही
तिला तो काहीही
झाले नाही ॥ ७६ ॥
मंडप सोडता
नायीकाच्या माथा
खांब तो पडता
इजा न हो ॥ ७७ ॥
गजानन कृपा
होता ज्याच्यावर
यमाचा प्रहार
चुकतसे ॥ ७८ ॥
भक्त रामचंद्रा
दिधले दर्शन
मठा सांभाळून
ठेव म्हणे ॥ ७९ ॥
श्रीगजाननाची
लिलासे अगाध
त्याचा सार बोध
कथीयला ॥ ८० ॥
गजानन कृपा
होता जेथे जेथे
चमत्कार तेथे
घडलेत ॥ ८१ ॥
गजानन कृपा
ज्या ज्या भक्तांवर
ते भवसागर
तरताती ॥ ८२ ॥
श्रीदासगणूचा
ग्रंथ गजानन
त्याच्या आधाराने
लिहिले मी ॥ ८३ ॥
माझ्यावर केली
कृपा गजानने
निर्मितीही तेणे
पूर्ण झाली ॥ ८४ ॥
त्यांच्याच पायीही
अर्पिली रचना
ही सर्व भक्तांना
लाभ देवो ॥ ८५ ॥

गजानन देवीदास कुळकर्णी

• • •

( पान ७ वरून चालू )

पहात आहेत. मंदिराभोंवती असलेल्या मोठाल्या इमारती आणि सालीना सुमारें दहा हजार रुपये वर उत्पन्न देणारी शेती या संस्थानच्या मालकीच्या आहेत. सुमारे दोन हजार लोकांची सोय होऊ शकेल इतकी तांब्या–पितळेची भांडी आणि बिछाईत वगैरे सामान संस्थानच्या संग्रही आहे, त्यामुळें श्री गजानन महाराजांच्या मंदिरात दरवर्षी वाङ्‌ग-निश्चय, लग्न, व्रतबंध यासारखीं शेंकडो मंगल कार्ये होतात. परंतु कोणत्याहि प्रसंगीं कोणाकडूनहि कोणत्याहि बाबीचें भाडे घेतले जात नाही. स्वखुषीनें लोकांनी दिलेल्या देणग्यांचाच काय तो स्वीकार केला जातो. अशा स्वखुषीनें मिळालेल्या देणग्यांचें उत्पन्न संस्थानला दरवर्षी दहा हजार रुपयांच्या जवळपास होत असावे. या शिवाय श्री गजानन महाराजांचे ठिकठिकाणीं जे भक्त आहेत, त्यांच्याकडून म. ऑ. नीं सुमारें १० हजार रुपये देणगीदाखल येतात. मंदिरातील पेट्यांमधून मिळणारी रक्कम सुमारें सात हजारांच्या आतबाहेर असते आणि शेतीचे सुमारे १० हजार रुपये असे एकुण सालीना ३५ ते ४० हजार रुपये उत्पन्न श्री गजानन महाराज संस्थानला होतें.

पण उत्पन्न जसे मोठे तसाच संस्थानचा खर्चहि मोठाच आहे. संस्थानतर्फे दरवर्षी रामनवमी, श्रीगजानन महाराजांची पुण्यतिथि, दासनवमी, कार्तिकी व आषाढी एकादशी, कृष्णजयंति, दत्तजयंति, हनुमानजयंति, दसरा आदि अनेक उत्सव मोठ्या थाटाने साजरे केले जातात. पण त्या सर्वांत रामनवमी आणि पुण्यतिथि ह्या उत्सवांना अधिक महत्त्व असून हजारोंच्या संख्येने या समारंभाला लोक उपस्थित असतात. ☆

# फलज्योतिषाचा श्रीगणेशा ( ओनामा )

[ लेखक — होरालंकार शं. वा. देवधर, दादर, मुंबई. ]

प्रत्येकाला आपले भविष्य समजाऊन घेण्याची उत्कंठा असतेच असते. दैवावर विश्वास असो अगर नसो परंतु प्रयत्नवादी मनुष्याला यश येईलच असे नाही, त्यालाही आपले भवितव्य जाणून घ्यावेसे वाटते. म्हणून सदरहू लेखमालेमध्ये सोप्या भाषेत व क्रमाक्रमाने हा विषय समजाऊन देण्याचा प्रयत्न केला जाईल. संपूर्ण लेखमालेचा अभ्यास केल्यास स्वतःची कुंडली स्वतःच वर्तविता येईल व प्रत्येकाला आपलेच ज्योतिषी बनता येईल, असा पूर्ण विश्वास वाटतो. अनेक ज्योतिष ग्रंथांचे वाचन व दीर्घ स्वानुभव यांच्या आधारावर ही लेखमाला लिहीत आहे. वाचकांना विशेषतः जिज्ञासूंना याचा अवश्य फायदा होईल अशी खात्री वाटते.

## ज्योतिष शास्त्राचा श्रीगणेशा — चंद्र

### ( लेखांक १ ला )

सर्व राशिभविष्ये चंद्राच्या राशीवरून लिहिली जातात. 'चंद्र' ज्या राशीत असतो तीच आपली रास असते. पृथ्वीच्या $\frac{3}{4}$ भागावर प्रचंड महासागर पसरले आहेत. चंद्राच्या आकर्षणाने भरती ओहोटी होते. चंद्र जर आपल्या पत्रिकेत बिघडलेला असेल तर इतर ग्रह चांगले असूनही मनुष्याला आयुष्यात समाधान व सौख्य मिळणार नाही. कारण सुखदुःख हे मनाचे विकार आहेत. मानापमान, भावना, मनोविकार ह्यांचा कारक चंद्र आहे. हा सर्व ग्रहांमध्ये पृथ्वीच्या अगदी जवळ आहे. कर्क राशिशी ही चंद्राची राशी आहे. कर्क राशीत चंद्र स्वगृही असतो. वृषभ राशीमध्ये तो उच्च स्थितीत असतो. वृश्चिक व मकर राशीमध्ये तो दुर्बल असतो. त्याचप्रमाणे शुद्ध पंचमीपासून वद्य पंचमीपर्यंत चंद्र बलवान स्थितीत असतो. चंद्राचे रत्न मोती हे आहे. चंद्र बिघडला असल्यास मोती धारण करावे. ग्रहांच्या रत्नांचा अनुकूल परिणाम होतो, हा जागतिक अनुभव आहे.

मेष राशीत चंद्र असला तर तरतरीतपणा व भव्य व्यक्तिमत्व दिसणार नाही परंतु मेंदू तरतरीत असेल. स्वभावात थोडा धांदरटपणा दिसला व हा धांदरटपणा विशेषतः लेखनामध्ये दृष्टिगोचर होत असला तरीही बुद्धिमत्तेच्या दृष्टीने मेषेचा चंद्र चांगलाच म्हणावा लागेल.

वृषभ राशीत चंद्र उच्च असतो असे म्हणतात. हा मनुष्य आनंदी व खेळाडू वृत्तीचा दिसून येईल. जीवनातल्या दुःखाच्या बाजूपेक्षा आनंदाच्या बाजूकडे त्याचे अधिक आकर्षण होईल. कल्पनाशक्ति व बुद्धिमत्ता चांगली असली तरी भावनेचा

त्यावर पगडा बसलेला दिसेल. इंद्रियसौख्य व ऐषआरामाकडे वृत्ति आकर्षित होतील. अंतःकरणात दयाबुद्धीला स्थान राहील.

मिथुन रास ही बौद्धिक रास समजली जाते. कल्पनाशक्ति, वाचनाची आवड, व साहित्यावर प्रेम विशेष दिसेल. कोणताही विषय आकलन करण्याची शक्ति असते. पण विचार बदलत जातात. आवडीनिवडी बदलतात. विनोदबुद्धि जागृत असते. ह्या राशीवर लेखक व कवि जन्माला येतात.

कर्क ही राशी चंद्राचे स्वगृह आहे. ह्या राशीमध्ये चंद्राचे विशेष गुण प्रत्ययाला येतात. हा मनुष्य समाजात मिसळण्याची इच्छा करतो व सामाजिक कार्य करतो. त्यामुळे त्याला समाजामध्ये स्थान प्राप्त होते. मनोवृत्ती खंबीर नसते. पण आपल्या वैयक्तिक गुणांनी दुसऱ्यावर छाप ठेवण्यात त्याला यश प्राप्त होते. कर्क राशीच्या अंगी कर्तबगारी करून दाखविण्याची धमक असते.

सिंह राशीची व्यक्ति थोडी गर्विष्ठ असते असा अनुभव आहे. आणि खरोखर गर्व बाळगण्यासारखे काही गुण त्यांच्यात असतात यात शंका नाही. स्वतः नीटनेटके वागणारे व तत्परतेने कार्य करणारे असतात व तसेच दुसऱ्यांनी असावे अशी त्यांची इच्छा असते. सिंह राशीच्या व्यक्तीमध्ये एक विशिष्ट ऐट असते असा अनुभव आहे.

कन्या राशीचा मुख्य गुण व्यवहार चातुर्य हा आहे. स्वतःचा मतलब कसा साधावा ते समजण्याचा उपजत गुण ह्या लोकांच्या अंगी असतो. प्रत्येक गोष्टीची पूर्ण चिकित्सा केल्याशिवाय ती गोष्ट ते स्वीकारीत नाहीत. मुलींची कन्या रास असणे चांगले असते. अशा मुली पुढे संसार चांगला कसोशीने करतात.

तूळ राशीची व्यक्ति मनुष्याची पारख करण्यात जात्याच वाकबगार असते. अनेक विषयांची माहिती त्यांनी मिळवलेली असते. त्यांची वागणूक सभ्यपणाची असते, अंतःकरण दयाळू असते व वृत्ति आनंदी असते. डावपेच करण्याची वृत्ति नसते पण दुसऱ्याचे डावपेच समजण्याची अक्कल मात्र नक्की असते.

वृश्चिक राशीची व्यक्ति धाडशी असते. घेतलेले कार्य तडीस नेण्यासाठी काहीही करण्यास मागेपुढे पाहात नाहीत. सूड घेण्याची प्रवृत्ति वेळप्रसंगी दिसून येते. आपल्यापेक्षा वरचढ व्यक्तिंशीही वरकडी करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. आपल्याहून श्रेष्ठ दर्जाच्या व्यक्ति बरोबर स्पर्धा करावी असे त्यांना वाटत असते.

धनु रास उत्साही आहे. त्यांच्या मनात काहीतरी महत्त्वाकांक्षा सदैव जागृत असते. स्वभाव जरासा चिडखोर असतो. मनाविरुद्ध गोष्ट घडल्यास राग येतो. पण तो सात्विक संताप असतो. औदार्य हा त्यांचा जन्मजात गुण असतो. हाती घेतलेल्या कार्यात भरपूर उत्साह असतो.

मकर राशीचा स्वभाव संशयखोर दिसून येईल. मनातली शंका ते बोलून दाखवणार नाहीत. समाधान लवकर होत नाही. थोडे मिळाल्यास आणखी मिळण्याची इच्छा असते. आपले नाव खराब होईल याची लोभामुळे ते पर्वा करीत नाहीत. आपले उद्दिष्ट

साध्य करण्याकरिता चांगल्या वाईट सर्व मार्गांचा अवलंब करण्यास ते मागेपुढे पाहाणार नाहीत. त्यामुळे लोक त्यांच्या पाठीमागे त्यांची निंदा करतात पण तोंडावर कोणी बोलत नाही.

कुंभ रास ही संशोधकाची रास आहे. बुद्धिमत्ता कल्पक असते. ह्या लोकांपासून सहसा कोणालाही त्रास होत नाही. दुसऱ्याकडून होणारा त्रास ते निमूटपणे सहन करतात.

मीन राशीची व्यक्ति वृत्तीने शांत असते. त्यांचे विचार मनातच राहातात. कारण त्याकरिता करावे लागणारे कष्ट करण्याची त्यांची तयारी नसते. त्यांच्या डोक्यात अनेक कल्पना नाचत असतात. पण त्या फारशा सुसंगत नसतात.

आतापर्यंत आपण चंद्र निरनिराळ्या राशीत जन्मकाळी असताना कोणती फले मिळतात याचे स्थूलमानाने परीक्षण केले. त्याचबरोबर चंद्राच्या व लग्नाच्या राशीवरून मनुष्याच्या शरीरावयवाचेही ज्ञान होऊ शकते हा ज्योतिषशास्त्राचा सिद्धांत आहे.

जन्मणाऱ्या मनुष्याचा चेहरा, डोळे, शरीर, अवयव, त्याचा आवाज, बोलण्याची पद्धति, दात व केस, हावभाव व शरीरावर असलेली विशिष्ट चिन्हे यांचे ज्ञान होऊ शकते. ईश्वरी निर्मितीचे वर्गीकरण करणे कठीण आहे यात शंका नाही. अभ्यासु मनुष्याने त्याचा योग्य उपयोग करून घ्यावा.

**मेष :** अश्विनी, भरणी व कृत्तिकांचा एक चरण मिळून मेष रास होते. वस्तुतः पाहाता प्रत्येक नक्षत्राची लक्षणे भिन्न भिन्न सांगितली आहेत. स्थूलमानाने मेष राशीच्या मनुष्याच्या ठिकाणी जी जी लक्षणे आढळली ती, एकत्र करून त्यांचे वर्णन केले आहे.

मेष राशी किंवा लग्नाच्या व्यक्तिची चालचलणूक अजागळासारखी प्रथमदर्शनी वाटते. बोलणे अडखळत, थांबून थांबून असते. हसणे कमीच. शब्द घोगरा आढळतो. खालची कवळी अरुंद असते. मुद्रा रागीट असावी असे वाटते. शरीर सडपातळ असते पण वय वाढत जाते तसे स्थूल होते. वर्ण तांबूस. दातातून रक्त येण्याची किंवा इतर काही व्यथा असते. राग पुष्कळ येतो. डोळे पिंगट वर्णाचे असतात. मस्तकावर किंवा तोंडावर कसल्या तरी निशाण्या असतात. प्रकृति उष्ण असते. अवयव काटक असतात. मनात येईल ती गोष्ट गवगवा न करता करणारा असतो. हे वर्णन त्या राशीत आणखी एकादा ग्रह असल्यास त्या ग्रहाप्रमाणे बदलेल हे लक्षात ठेवावे.

**वृषभ** – कृत्तिकांचे तीन चरण, रोहिणी व मृगांचे दोन चरण मिळून वृषभ रास होते.

वृषभ राशीचा बांधा गोंडस असतो. उंची मध्यम असते. दात शुभ्र वर्णाचे, वर्ण सफेत व पाणीदार गौर व तेजस्वी, चेहरा मोहक व सुंदर असतो. डोळे स्वच्छ व पाणीदार असतात. गाल, हात व मनगटे गोल असून भरदार असतात, तोंडावर बहुधा वांग असतात. ह्या राशीच्या स्त्रिया तेजस्वी व गौर असतात. वृषभ राशीच्या रोहिणी नक्षत्राला वरील वर्णन जितके जुळेल तितके इतर नक्षत्र विभागाना जुळणार नाही.

**मिथुन** – मृगांचे दोन चरण, आर्द्रा व पुनर्वसूचे तीन चरण मिळून मिथुन रास होते. ह्या राशीचे लोक मोठ्या संख्येने आढळतात.

चेहरा दिसण्यात आकर्षक, हनुवटीच्या भागाकडे निमुळता, लांबट. डोके मागल्या बाजूस लांबट, नारळासारखे शरीर. सडपातळ व उंच. वर्ण काळसर, डोळे काळे केस बारीक. वाणी स्पष्ट, बोलकेपणा विशेष, पोक काढून चालण्याची ढब असते.

**कर्क** – पुनर्वसूचा एक चरण, पुष्य व आश्लेषा मिळून कर्क रास होते.

पुढचे दात रुंद व मोठे असून सहज दिसणारे. चेहरा गोल असून मोहक असतो. हाताचे पंजे, बोटे आणि पावले हे अवयव मोठाले असतात त्यामुळे धावण्यात पटाईत असतो. पावले वाकडी पडतात. बांधा साधारण मध्यम, उंची मध्यम पण मजबूत बांधा, दमा व हार्टडिसीज हे ह्या राशीचे रोग आहेत.

**सिंह :** मघा, पूर्वा व उत्तरांचा एक पाद मिळून ही सिंह राशि होते. दांत अतिशय मजबूत, छाती रुंद व भरदार, कपाळ मोठे व पुढे आलेले, चेहरा व भुवयांच्या बाजूने सूक्ष्म दृष्टीने पाहिल्यास सिंहासारखा दिसणारा, नाक नकटे पण शरीर मजबूत असते. वर्ण काळसर पण शब्द मोठा असतो. छाती पुढे काढून चालण्याची ढब असते.

**कन्या :** उत्तरांचे तीन चरण, हस्त व चित्राचे दोन चरण मिळून कन्या रास होते. उभे राहिल्यावर व चालताना मान किंचित वाकडी करतो. लाजाळू वृत्ति असते. कामात संथ व मुळचा आळशी, चालताना हात जास्त हालवतो. हांसत बोलतो. चेहरा रुंद व गोल असतो. चाल हत्तीसारखी डुलत. स्वर बारीक असतो.

**तूळ :** चित्रांचे दोन चरण, स्वाती व विशाखाचे तीन चरण मिळून तूळ रास होते. चेहरा, हात, पायाच्या नळया बाकदार, एकंदर शरीर लांबट असते. हसणे तोंड आकुंचित करून व मासलेदार असते. बोलणे जपून व काटेकोर असते व बोलताना उभ्या माना हालवतो. चालताना पोक काढल्यासारखा वाटतो.

**वृश्चिक :** विशाखा एक चरण, अनुराधा व ज्येष्ठा मिळून वृश्चिक राशी होते. कमरेच्या वरच्या भागापेक्षा खालचा भाग तोकडा, उंची कमी. नाक मोठे व फुगीर, दात मोठे, वर्ण गोरा, तोंडाचा जबडा मोठा असतो.

**धनु :** मूळ, पूर्वाषाढा व उत्तराषाढांचा एक चरण मिळून धनु रास होते.

छाती पुढे काढून डुलत चालणे. शरीराची ठेवण बांधेसूद व थिप्पाड, सडसडीत असून फार काटक. गळा व हनुवटी हे भाग रेखल्यासारखे, मान भरदार, मनगटे जाड, बोलण्यात बळाचा गर्व विशेष. वर्ण साधारण गोरा, डोळे पिंगट अशी ही लक्षणे असतात.

**मकर :** उत्तराषाढाचे तीन चरण, श्रवण व धनिष्टाचे दोन चरण मिळून मकर रास होते.

शरीर किरकोळ व मान उंटासारखी असते. एकदम मोठ्याने व मध्येच हळू बोलणारा, शरीराचे कित्येक अवयव वाजवीपेक्षा स्थूल, अंगविक्षेप हास्यास्पद, वातबद्ध शरीर, भुवयांचे केस राठ, शरीराचे मानाने डोके फार मोठे व जबडा मगरासारखा बारीक अशी लक्षणे असतात.

**कुंभ :** धनिष्ठाचे दोन चरण, शततारका व पूर्वाभाद्रपदांचे तीन चरण मिळून कुंभ रास होते. शरीर स्थूल, डोक्याला बहुधा टक्कल, कपाळाचे दोन बाजूंचे भाग निमुळते, व चेहरा देखणा असतो.

**मीन :** पूर्वा भाद्रपदांचा एक चरण, उत्तरा भाद्रपदा व रेवती मिळून मीन रास होते.

शरीर फार ठेंगणे, डोके व शरीराचे अवयव फारच लहान, वर्ण साधारण गोरा अशी या राशीची लक्षणे आहेत.

याप्रमाणे राशींची सामान्य लक्षणे आहेत. एका राशीची सर्व लक्षणे एकाच माणसाचे ठिकाणी मिळतीलच असे नाही. ज्यावेळी एकादे लक्षण आढळेल तेव्हा निश्चयात्मक ज्ञान होईल.

दुसरी महत्त्वाची गोष्ट ध्यानात ठेवावी की ही लक्षणे जन्मराशी व जन्मलग्न यांना अनुसरून लिहिली आहेत. आपली जन्मरास व लग्नरास दोन्हांची लक्षणे एकत्र वाचून पाहा म्हणजे आपल्याला त्या व्यक्तीचे चित्र निश्चित पाहावयास मिळेल. काहीच जुळले नाही तर आपली रास अगर लग्न चुकीचे आहे असे समजून ती दुरुस्त करून घ्यावी लागतील.


# श्रीसाईलीला

## खास विजयादशमी अंक — ऑक्टोबर १९७४

- श्रीसाईबाबांच्या ५६ व्या पुण्यतिथी निमित्य खास लेख.
- "साईभक्तांची श्रद्धास्थाने" या नाविन्यपूर्ण सदरात गोव्यातील डिचोलीचे श्रीसाई मंदिर.
- साईभक्त डॉ. के. भ. गव्हाणकर यांचा विचारप्रवर्तक लेख.
- "शिरडीचे साईबाबा व आम्ही" हा श्री. काकडे यांचा वाचनीय लेख.
- संत चूडामणी श्रीसाईबाबांचा अंतीम दिन सदानंद चेंदवणकर यांचा रंजक लेख.
- भेटी गाठी या सदरात साईचित्रकार श्री. स. कृ. काळे याशिवाय श्रीसाईनाथ चरित्र, साहित्यदर्शन इ० भरपूर मजकूर.

पृष्ठे ४८ किंमत अवघी साठ पैसे

# श्री साईनाथ

## ( श्रीसद्‌गुरु साईमहाराज ललित-चरित्र )

● र. श्री. पुजारी ( पुणे )

### २७. बाबांच्या भक्तांवर अशी अपघातात सापडण्याची पाळी का यावी ?

कोपरगावच्या सरकारी इस्पितळातील नोकरांचे ते तीन दिवस मोठ्या चिंतेत गेले. डॉक्टर, नर्सेस, आया यापैकी कोणाच्याही डोळयास या तीन दिवसात डोळा नाही. मग जेवणखाण, फुरसदीच्या गप्पा, रजा यांच्यासाठी वेळ कोठला ! पहावे तेव्हा जो तो चिंतेत मग्न ! खालीपासून वरपर्यंत सर्व नोकरांना चिंता एकच आता या पेशंटचे काय होणार. कसे होणार ! काही बरे-वाईट झाले तर अपकीर्ती सर्वांवरच. न जाणो, या प्रकरणात सर्वांच्या नोकऱ्याही जायच्या !

तो पेशंट स्पेशल खोलीतील आपल्या कॉटवर डोळे मिटून पडून होता. श्वास मंदपणे चालू होता. उशाशी तीन डॉक्टर्स उभे होते. पायथ्याशी तीन नर्सेस उभ्या होत्या. डॉक्टरांच्या मुखातून निघण्याऱ्या आज्ञेचीच त्या नर्सेस वाट पाहात होत्या.

ते तिघे डॉक्टर्स त्या इंग्रज पेशंटचे निरीक्षण संथपणे करीत होते. मनाशी म्हणत होते काय करावे ? आज तीन दिवस झाले, या पेशंटने डोळेही उघडले नाहीत. हा कसला ॲटॅक तर नव्हे ! मेंदूत रक्तास्राव तर सुरू नाही ! पोट, छाती, डोके अशा नाजुक जागी जबर मार तर बसला नाही ! हा पेशंट डोळे उघडत नाही त्याअर्थी आम्ही काय समजावे ? नुसत्या कण्हण्यावरून कोणती उपाययोजना करावी ?

आपली ही हतबलता एका तरुण डॉक्टराने तेथेच बोलूनही दाखविली. तोच काय चमत्कार झाला न कळे ! पेशंट आपले डोळे उघडण्याचा प्रयत्न करू लागला. अखेर मोठ्या कष्टाने त्याने आपले डोळे उघडले. इंग्रजीत तो म्हणाला, " डॉक्टर, काही घाबरू नका. मला काहीही झालेले नाही. फक्त थोडे खरचटले, पाठीला थोडा मुका मार लागला, इतकेच. याहून विशेष काहीही नाही. "

त्या बड्या इंग्रज पेशंटने आपले निळे डोळे श्रमामुळे पुन्हा मिटले. कण्हत तो म्हणाला, " अपघात आहे हा ! इतकी दुखापत व्हायचीच. पण देवाची कृपा ही की यातूनही वाचलो. "

तो पेशंट हळूहळू चांगला शुद्धीवर झाला. अपघात कसा झाला, आपण कसे फेकले गेलो हे सर्व त्याला स्पष्टपणे स्मरू लागले. पण झाल्या गोष्टीस इलाज नव्हता. इस्पितळात येऊन पडण्याविना आता गत्यंतरच नव्हते.

तो मनुष्य पडल्या पडल्या विचार करू लागला.

स्वतःशी म्हणाला माझ्यासाठी या बिचाऱ्या डॉक्टरांची केवढी ही धावपळ! सबंध तालुक्यातील डॉक्टर्स येथे धावत आले! बाकीच्या नेटिव्ह पेशंटांना तसेच टाकून माझ्या उशापायथ्याशी बसले!

बरोबरच आहे! मी इंग्रज मनुष्य. त्यांचा राज्यकर्ता. पर्यायाने त्यांचा राजा! अशा राजाची काळजी या डॉक्टरांनी करायची नाही तर कोणाची!

अरेरे! गुलामगिरीची मुळे या देशात फारच खोल रुजली. मला अपघात झाला, टांग्यातून मी फेकला गेलो हा अपराधही जणू यांचाच! तसे नसते तर या नेटिव्ह डॉक्टरांचे चेहरे इतके उतरले नसते. आवाजही इतका खोल गेला नसता.

हळूहळू त्या इंग्रज माणसाची प्रकृती सुधारू लागली.

पण पडून राहाण्याचा कंटाळा येऊ लागला. स्वतःशी तो म्हणू लागला : अशा या फुरसदीच्या वेळी गप्पागोष्टी करण्यास मजकडे एखादा नेटिव्ह मनुष्य असता तर किती बरे झाले असते! मनमोकळेपणी मी त्याच्याशी बोललो असतो. पण असा मनुष्य माझ्याकडे कसा येणार? मन मोकळे करून कसा बोलणार?

जन्मभर मुलाबाळांना धाकात ठेवणारा करड्या वृत्तीचा बाप म्हातारपणी त्यांच्या कितीही जवळ गेला तरी मुले त्याला जवळ करीत नाहीत. बाप समोर दिसण्याचा अवकाश, रंगात आलेल्या गप्पा तशाच अर्धवट टाकून ती तेथून निघून जातात!

करड्या अमलामुळे येथील सर्वसामान्य जनतेच्या प्रेमाला पारखे झालेले आम्ही इंग्रज असे!

अशा मनःस्थितीत त्या इंग्रज गृहस्थाने एक दोन दिवस काढले. पुढे एक दिवस एका नेटिव्ह गृहस्थांची एक चिठ्ठी त्याच्या हाती आली. सुंदर इंग्रजी हस्ताक्षरात तिच्यात एवढाच मजकूर होता, "आपली प्रकृती पाहाण्यासाठी मी आलो आहे. आपली इच्छा असल्यास भेटीची परवानगी मला मिळावी ही विनंती."

एखाद्याने दर्शनासाठी देवाची प्रार्थना करावी आणि देवाने येऊन नेमके त्याच्या पुढ्यात उभे राहावे!

त्या इंग्रज गृहस्थाला ती चिठी वाचून अतिशय आनंद झाला. चिठी घेऊन येणाऱ्या नोकराला मोडक्या हिंदीत तो म्हणाला, "त्यांना सांग की अवश्य या. मला आनंद वाटेल."

प्रकृतीसंबंधी, तेथील डॉक्टरी व्यवस्थेसंबंधी, हवापाण्यासंबंधी बोलणे झाल्यानंतर तो इंग्रज मनुष्य म्हणाला, "या शिरडी–कोपरगाव रस्त्यावर गेल्या काही वर्षांत असेच अपघात झाले असे ऐकतो. त्या अपघातांपैकी पुष्कळ लोक या दवाखान्यात उपचार होऊन परत गेले. मला एक शंका येते. ती अशी की एका साधूच्या गावाहून परत येणाऱ्या भक्तावर अशी अपघातात सापडण्याची पाळी का बरे यावी? या मागील गौडबंगाल तरी काय असावे? भुताटकीचा तर हा काही प्रकार नव्हे! चेटूक, करणी, भानामती असा तर काही प्रकार यामागे नसावा!

तिकडे आमच्या विलायतेत असताना मी ऐकले होते की या देशातील लोकांना गूढविद्या अवगत आहे. जादूटोणा ते करू शकतात. सर्पांनाही वश करून ते त्यांना खेळवितात.

त्या प्रतिष्ठित महाराष्ट्रीय गृहस्थाना एका सुशिक्षित इंग्रज माणसाचा या देशाविषयीचा हा ग्रह ऐकून प्रथम थोडे हसू आले. पण ते प्रकट न करता शांतपणे ते एवढेच म्हणाले, "घटना सत्य दिसतात. त्यांची कारणमीमांसा मात्र अनेक तऱ्हांनी केली जाते. परदेशातील लोकांचा या देशासंबंधी असा ग्रह होणेही शक्य आहे."

परस्परांसंबंधी अशा प्रकारे विश्वास निर्माण झाल्यानंतर अशा घटनांमागे बाबांची काही प्रेरणा, हेतू वगैरे तर नसेल ना, ही त्या इंग्रज गृहस्थांची शंका ऐकून ते महाराष्ट्रीय गृहस्थ म्हणाले, "कोणी मला भोळा भक्त म्हणो की हेटाळणीही करो, ती ऐकूनही मी निश्चितपणे म्हणू शकेन की अशा प्रकारांमागे बाबांचीच काही प्रेरणा जरूर असली पाहिजे. तिचा उद्देशही भक्तांना काही शिकविणे हाच असला पाहिजे."

तो इंग्रज मनुष्य पाहातच राहिला.

मग शांतपणे त्या गृहस्थाना म्हणाला, "साधुसंत म्हणजे तर साक्षात दया क्षमा अपकारांची फेड उपकाराने करणारे ते महात्मे. क्रूसावर चढवून खिळेठोक चालली असताना भगवान येशूने देवाची प्रार्थना केली : Forgive them My Lord! They Know not what they do!

असे असताना बाबांनी आपल्या भक्तांना असे संकटात का घालावे? त्यांना दवाखान्यात खितपत का पाडावे? नोकरीविषयी आणि प्रकृतीविषयी त्यांना चिंता निर्माण का करावी?"

त्या महाराष्ट्रीय गृहस्थाना बाबांनी निर्माण केलेले असे अनेक प्रसंग आठवू लागले.

तात्या कोते पाटील एकदा याच कोपरगावच्या आठवड्याच्या बाजाराला निघाले. बाबांची आज्ञा घेतल्याशिवाय शिरडीच्या बाहेर कुणीही पाऊल टाकायचे नाही हा शिरस्ता. तो त्यांच्या हाडीमासी खिळलेला. तरीही त्या दिवशी तात्यांना जाण्याची घाई सुटली. टांगा मशिदीच्या दारात उभा करून धावत धावत आत आले. घाईघाईने बाबांना नमस्कार करून म्हणाले, "मामा, मी कोपरगावला जातो. बाजाराला. मला परवानगी द्या."

तात्यांचे वय लहान. स्वभाव उतावीळ. त्यातच तीनशे रुपये देऊन टांग्याला एक नवा उमदा घोडा नुकताच खरेदी केलेला. त्यामुळे तात्या फारच घाई करू लागले. हे पाहून बाबा म्हणाले, "हे बघ तात्या, तुझी एवढी घाई का? थांब जरा आजचा दिवस नाही गेलास बाजाराला तर काय बिघडेल! नको जाऊस आज."

बाबांची ही आज्ञा ऐकून तात्यांचा फारच हिरमोड झाला. त्यांनी तोंड वाकडे

केले. म्हणाले, "हे काय मामा! तुमचे नेहमी हे असेच! कोठे बाहेर निघालो की तुमचा मोडता!"

तात्या एक नाही दोन नाही, चौदा वर्षं मशिदीत बाबांच्या जवळ झोपलेले. त्यांच्या अंगाखांद्यावर खेळलेले. तात्यांची ही नाराजी बघून बाबा विरघळले. तात्याना म्हणाले, "अगदी जातोच म्हणतोस? बरे बरे. जा. पण शामाला संगे घेऊन जा."

"जा" एवढा बाबांच्या शब्द तात्यानी ऐकला मात्र – तेथून जे सुटले ते थेट टांग्यात! मग टांगा जो चौखूर सुटला तो मध्ये कोठे थांबण्याची बात नाही!

होता होता साऊळ विहीर आली आणि दोन्ही घोडी बेफाम झाली.

कधी चाबकाचा स्पर्शही अंगाला न होऊ देणारा, डोळ्याचे पाते लवते न लवते तोवर कोपरगाव गाठणारा तो तीनशेचा घोडा धावता धावता एकदमच कमरेत कचकला. धाडकन खाली पडला. टांगा उलटला. त्याच्याखाली तात्या सापडले. लोकांनी त्यांना ओढून बाहेर काढले.

एवढी शोभा झाल्यानंतर कोठे तात्यांच्या ध्यानी सर्व काही आले! डोळे उघडले! तरी बाबा त्यांना म्हणाले होते, "अगदी जातोच म्हणतोस? बरें जा. पण शामाला संगे घेऊन जा."

जी गोष्ट तात्या कोत्यांची तीच गोष्ट तात्या कोल्हारांची.

तात्या कोल्हारही असेच अगदी घोड्यावर बसून आलेले! "अगदी जातोसच?" एवढे बाबांचे शब्द कसेबसे कानानी ऐकले मात्र–टांग्यात चढले. टांगा धावू लागला. रस्त्याच्या कडेला जाऊन बेभानपणे बाभळीच्या एका झाडावर आदळला. मोडला. बरे तर बरे, नाही तर तात्या कोल्हारांचा त्या दिवशी प्राणच जायचा.

तात्या कोते आणि तात्या कोल्हार यांना टांग्याचा अपघात झाला. या इंग्रज गृहस्थानाही तशाच तऱ्हेचा अपघात झाला. काय असावे बरे या अपघातांमागील कारण? बाबांची अवज्ञा हेच कारण असले पाहिजे. दुसरे कोणते?

त्या महाराष्ट्रीय गृहस्थांनी त्या इंग्रज मनुष्याला विचारले, "माफ करा, आपल्याला झालेल्या अपघाताची सविस्तर माहिती मला कळली तर बाबांच्या अनेक गूढांपैकी एखाद्या तरी गूढाचे ज्ञान मला होईल. त्या प्रकाशात आपल्या प्रश्नाचे उत्तर श्री बाबांच्या कृपेने मला कदाचित देताही येईल."

तो इंग्रज मनुष्य सांगू लागला.

म्हणाला, "माझ्या सबंध जीवनाशी आणि प्रतिष्ठेशी निगडित असा एक प्रश्न मनात धरून, श्री. चांदोरकर यांच्या सांगण्यावरून श्री. माधवराव देशपांडे यांना पत्र घेऊन मी शिरडीस गेलो. माधवरावांनी माझी व्यवस्था छान केली. मला उतरण्यास एक स्वतंत्र तंबूही दिला.

पण एका गोष्टीमुळे मी तेथे कष्टी झालो. ती गोष्ट म्हणजे मशिदीत मला प्रवेश

मिळाला नाही. तीन तीन वेळा प्रयत्न करूनही मशिदीच्या त्या मोजक्या पायऱ्या चढण्याची हिंमत काही मला झाली नाही.

मला एकसारखे वाटे : बाबा म्हणजे साक्षात येशूच आहेत. त्यांच्या दिव्य मुखमंडळावर कोटी सूर्यांची प्रभा आहे. अखिल मानव जातीच्या दुःखामुळे त्यांचे डोळे कारुण्याने ओथंबले आहेत. आपले प्रेमळ बाहू पसरून दुःखी जीवमात्रांना ते जवळ बोलावीत आहेत. जणू म्हणत आहेत : माझ्या लेकरांनो ! असे माझ्या जवळ या. अगदी माझ्या हृदयाशी या.

बाबांचे ते प्रेमळ डोळे पाहून मी मनात म्हणे; प्रभो, तुम्ही मला संकेताने जवळ बोलावता, पण आपल्या चर्चेची पायरी मात्र चढू देत नाही. याला मी काय म्हणू ?

वाटते : मी वर यावे. आपल्या पायाशी बसावे. आपला शुभ हात हाती घ्यावा. प्रेमाने त्याचे चुंबन घ्यावे.

गुडघे टेकून मी आपल्या पायांशी बसलो आहे; माझे ओठ आपल्या हातावर टेकले आहेत; डोळे तृप्तीच्या आनंदाने भरले आहेत; असे मला किती वेळा वाटे ! किती वेळा हा गोड भास मला होई ! पण डोळे उघडून पाहातो तो आढळे की मी मशिदीत नसून सभामंडपात आहे ! तुम्हापासून किती तरी दूर अंतरावर आहे !

बाबांनी मला दूर ठेवले. आपला स्पर्शसुद्धा मला घडू दिला नाही. याचे कारणही काही तरी असले पाहिजे. निश्चित असले पाहिजे.

भागोजी शिंद्यासारखा महाव्याधीने पछाडलेला मनुष्य रोज सकाळीं बाबांच्या हातांच्या पट्ट्या सोडून त्यांना तुपाने मालिश करतो. लेंडीवर जाण्यासाठी ते निघाले की एका हाताने त्यांचे टमरेल धरून दुसऱ्या हाताने त्यांच्यावर छत्री धरतो. मशीद असो, चावडी असो, त्यांना एक क्षणही विसंबत नाही. बाबांच्या हाताला झालेल्या जखमा बऱ्या होऊनही भागोजीची सेवा कधी चुकत नाही की सुटत नाही. अशा भाग्यवंताला कोणते नाव देऊ ? देवदूत म्हणू का संत म्हणू ? खरोखर तो भागोजी शिंदे कोणी संतच असला पाहिजे. त्याविना बाबा त्याला इतका जवळ करणार नाहीत.

त्या महाराष्ट्रीय गृहस्थाना भागोजी शिंद्यामुळे एका महारोगी बाईची आठवण आली. हात-पाय-नाक झडलेले, अंगातून रक्त-पू गळत असलेले, सर्वांनी टाकलेली, अशी ती स्त्री शिरडीस आली. बाबांना अनन्य शरण होऊन म्हणाली, " बाबा, आता जगात मला आई-बाप-भाऊ सर्व तुम्हीच. तुमच्या पायाशी मरण यावे एवढीच एक इच्छा. "

बाबांनी भीमाबाई नावाच्या एका मराठा जातीच्या स्त्रीला बोलवून घेतले. तिला त्या महारोगी बाईला आपल्या घरी राहाण्यास जागा दे असे सांगितले. ही आज्ञा ऐकून भीमाबाई म्हणाल्या, " बाबा, तिला महारोग झाला आहे ना ? तिला माझ्या घरात जागा कशी देऊ ? " हे ऐकून बाबा म्हणाले, ' अगे, ती महारोगी

असली म्हणून काय झाले ? ती माझी बहीण आहे. सख्खी बहीण आहे. तिला आपल्या घरी घेऊन जा. ”

बाबांची ही इच्छा ऐकून भीमाबाई त्या महारोगी स्त्रीला आपल्या घरी घेऊन गेली.

पुढे एक महिन्याने ती महारोगी स्त्री भीमाबाईच्या घरी वारली.

तीच गोष्ट बाळाजी पाटील नेवासकर यांची.

नेवासकर आपल्या गावी जाण्यासाठी बाबांकडे परवानगी मागू लागले. तेव्हा बाबा त्यांना म्हणाले, “ तो दगडूभाऊ आजारी आहे. त्याच्याकडे आपण लक्ष द्यावे. ”

दगडूभाऊ जातीचा मुसलमान. रक्तपितीने त्या स्त्रीप्रमाणेच पिडलेला. पाटलानी रोज त्याच्या अंगातील किडे काढावे. लस स्वतः धुवावी. त्याला स्नान घालावे. वस्त्रे नेसवावीत. एखाद्या लहान मुलाप्रमाणे भरवावे. असा एक महिना गेला. पुढे दगडूभाऊ वारला. त्यानंतर पाटलाना घरी जाण्याची परवानगी मिळाली.

ते महाराष्ट्रीय गृहस्थ अशाच कित्येक गोष्टी मनात आठवल्यामुळे विचारात गढून गेले. मग मनाशी म्हणाले: तसेच काही विशेष कारण असल्याशिवाय बाबा कोणाही शरणागताला असे दूर ठेवणार नाहीत. या इंग्रज मनुष्याला ज्या अर्थी त्यांनी असे दूर ठेवले त्याअर्थी बाबा त्यालाही एक दिवस जवळ घेणार आहेत. परंतु त्यास अद्याप अवकाश आहे.

खरोखर ‘ निष्ठा ’ आणि ‘ सबूरी ’ यांचीच ही पारख दिसते. ती पुरी झाल्याविना या गृहस्थांचे पाऊल मशिदीत पडणे शक्य नाही.

त्या इंग्रज गृहस्थांना ते म्हणाले, “ आपण इकडे येण्याच्या दिवशी काय घडले ? अपघात कसा घडला ? ”

त्या गृहस्थांच्या या मूळ प्रश्नाचा रोख ध्यानी येताच ते इंग्रज गृहस्थ शरमिंदे झाले. दिलगिरीच्या स्वरात म्हणाले, “ माफ करा. मी मूळ विषय सोडून एकदमच बाजूस गेलो. आता सर्व प्रसंग जसा घडला तसा सांगतो.

त्या दिवशी मी रोजच्याप्रमाणे अंगणात म्हणजे सभामंडपात आलो. गुडघे टेकले. मान खाली करून, नमस्कार करून बाबांना म्हणालो, “ मी येतो. मला मुंबईस जाण्याची आज्ञा असावी.”

बाबा मला म्हणाले, “ एवढी घाई कसली ? उद्या जाशील म्हणे.”

मी मनाशी विचार केला : बाबा हे एक संत साधू. त्यांना ना घर ना प्रपंच. ना नोकरी ना धंदा. ना कसली जबाबदारी ना कसली चिंता. आम्ही प्रापंचिक माणसे. आम्हाला हवे तितके दिवस एखाद्या ठिकाणी कसे राहाता येईल ? मोठमोठी कार्ये आमच्या येण्याविना तेथे अडून बसलेली. ती कोण करणार ? वेळीच नाही झाली तर त्याला जबाबदार कोण ? म्हणून कोणत्याही सबबीमुळे आता येथे राहाणे जबाबदार-

पणाचे होणार नाही. बाबांच्या दर्शनाचे काय ? महत्त्वाची सर्व कामे उरकून पुढल्या आठवड्यातही मला पुन्हा येथे येता येईल. बाबांच्या चरणी रुजू होता येईल.

माझ्या या विचाराला मोडता घालणारी पुष्कळच माणसे मला तेथे दिसली.

गाडी चुकणे, अपघात होणे, जेवण न मिळाल्यामुळे उपास पडणे, आजारीपण येणे अशी कित्येक कारणे त्यांनी मला सोदाहरण पटविण्याचा प्रयत्न केला. पण त्यातील एकही कारण मला पटले नाही. मी म्हणालो, "बाबांच्या परवानगीचा आणि या गोष्टींचा संबंध काय ? साधुसंत तर आपले दयाळू मायबाप. ते आपणावर संकट आणणे कधी तरी शक्य आहे काय ?"

मी टांगा केला आणि निघालो.

साऊळ विहीर ओलांडून थोडा पुढे गेलो असेन नसेन, टांग्याचे दोन्ही घोडे अकस्मात बिथरले. वेडेवाकडे धावू लागले. एवढ्यात, दुर्दैव असे की एक नवशिका सायकलस्वार टांग्याला आडवा आला. त्याला चुकवायला टांगेवाला गेला आणि टांगा मागल्या मागे उलटला. मी फेकला गेलो. धाडकन तोंडावरच आपटलो.

एवढा प्रकार एका क्षणात घडल्यानंतर कोठली मुंबई आणि काय ! मला ब्रह्मांड आठवले. डोळ्यासमोर काजवे चमकू लागले. तशा स्थितीत रस्त्यावरच्या दयाळू लोकांनी टांगा पुन्हा जोडून मला टांग्यात बसविले. या हॉस्पिटलमध्ये आणून पोचते केले.

मी मनाशी ठरविले एक आणि झाले भलतेच !

आता येथे किती दिवस पडून राहावे लागणार आहे, एक देवच जाणे !

त्या महाराष्ट्रीय गृहस्थांच्या डोळ्यापुढे बाबांची अवज्ञा करणारी अशीच दोन चार विद्वान मंडळी आली. त्यात पंढरपूरचे मामलेदार तात्यासाहेब नूलकर होते. सॉलिसिटर भाऊसाहेब दीक्षित होते. वांद्र्याचे मॅजिस्ट्रेट दाभोळकर होते.

"उद्या सकाळी जा व कोपरगावाहून जेऊन जा" ही बाबांची आज्ञा नूलकर-दीक्षितानी तंतोतंत पाळली नाही याची शिक्षा त्यांना सौम्यपणे का होईना भोगावी लागली. "भाकर तुकडा खाऊन दुपारानंतर परत जावयास नीघ" या आज्ञेकडे दाभोळकरांनी दुर्लक्ष केले, याची शिक्षा म्हणून दाभोळकरांच्या धावत्या बैलगाडीचे चाक निसटून गटारात पडले. पण साईकृपेमुळे बायकामुलांपैकी कोणासही काही इजा–दुखापत झाली नाही.

तेच रघुवीर भास्कर पुरंदरे यांनी बाबांची आज्ञा शब्दशः पाळली म्हणून त्यांच्या भावाचा ताप नाशकास असताना आपोआप गेला. मुंबईस चलण्याची घाई करीत असलेल्या नातेवाईकांना पुरंदरे निर्धारपूर्वक म्हणाले, "महाराजानी येथे दोन दिवस राहावयास सांगितले आहे. तर दोन दिवस झाल्याशिवाय मी येथून हलणार नाही."

आताच्या या इंग्रज गृहस्थानी सर्व जगाची जबाबदारी अहंकारामुळे आपणावर ओढवून घेऊन बाबांची अवज्ञा केली. म्हणूनच हे संकट त्यांच्यावर गुदरले. या परक्या गावात त्यांना असे एकाकीपणी खिचपत पडावे लागले.

पण यातही बाबांचा एक हेतू आहे. तो म्हणजे या गृहस्थाना जाग आणावी. योग्य ते अध्यात्मिक परिवर्तन यांच्यात घडवावे.

त्या इंग्रज गृहस्थांचा निरोप घेता घेता ते महाराष्ट्रीय गृहस्थ अगदी सहजपणे पुन्हा बोलून गेले, " भक्ताला काही शिकविणे हाच बाबांचा हेतू त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसत असतो. "

**२८. अपघात, आजार, डांबणूक हा बाबांच्या वात्सल्याचाच खेळ आहे.**

आजारीपण हे मनुष्याचे शारीरिक परिवर्तन तर खरेच; पण मानसिक परिवर्तनही असू शकेल काय ?

या आजारात त्या इंग्रज गृहस्थांनी जितक्या हिंदी माणसांच्या भेटी घेतल्या तितक्या कधी क्वचितच घेतल्या असतील.

भेट घेताना निरोप घेऊन आलेल्या नोकराला पहिला प्रश्न ते इंग्रज गृहस्थ विचारीत तो हा की आलेला मनुष्य शिरडीहून आलेला आहे काय ? बाबांचा भक्त आहे काय ?

या एका आठवड्यात त्या गृहस्थानी बाबांविषयी इतके ऐकले, इतके समजावून घेतले की हळूहळू त्यांचे त्यांनाच वाटू लागले की बाबांच्या लीला हाच एक आपल्या सर्व व्यथांवरील दवा आहे. तो दवा कोणत्याही वेळी, कितीही प्रमाणात, कोणाच्याही हातून पुनःपुन्हा घेतला तर बाधणारा तर नाहीच; उलट क्षणाक्षणाला आपल्या शारीरिक आणि मानसिक व्याधींचा परिहार करणारा आहे.

एका काळोख्या रात्री बाबांची एक विशिष्ट लीला त्यांना एकसारखी आठवू लागली.

याच कोपरगाव तालुक्यातील कोराळे गावचा एक दलाल. अमीर शक्कर. जातीने खाटिक; पण वृत्तीने बाबांचा परम भक्त. तो वाताच्या विकाराने हैराण झाला. बांद्यातील आपला उद्योगधंदा क्षणभर वाऱ्यावर सोडून शिरडीस आला. व्याधीचे स्वरूप बाबांच्या कानी घातले. व्याधीतून मुक्त करण्यासाठी मनोभावे प्रार्थना केली.

बाबा त्याला म्हणाले, " तू चावडीत जाऊन राहा. मग बघू. "

ती चावडी म्हणजे कोणत्या कालातील जुनी, पडकी छप्परवजा इमारत. तेथे पाली, सरडे, विंचू, साप किती निघतील याला गणती नाही. त्यातच तेथे भिकारी-टाकारी, महारोगी, लूत भरलेली कुत्री यांची वस्ती.

चावडीची मागील बाजू म्हणजे उकिरडा. त्यातून चावडीत थेट शिरलेली एक शंभर भगदाडे. त्या भगदाडांतून केव्हा, काय आत येईल नेम नाही. तशात वरून

धो धो पाऊस. खालून जमिनीला आलेली ओल. दारे, खिडक्या नसल्यामुळे सर्व बाजूंनी आत घुसणारा पाऊस, वारा, थंडी —

तो अमीर अगदी कातावून गेला, पण करतो काय? बाबांची आज्ञा म्हणूनच तेथे राहिला. ओलीमुळे संधिवाताने सांधे धरले तरी तो तेथे राहिला. एक दोन महिने नव्हे; चांगला नऊ महिने!

बाबांनी त्याला सांगून ठेवलेले, "वारा असो, पाऊस असो, ओल असो— येथून हलायचे नाही. तक्रार म्हणून करायची नाही. तसेच येथे राहायचे. तू आपोआप बरा होशील."

या एवढ्या दुःखात त्या अमीर शक्करला दिलासा देणाऱ्या दोन गोष्टी तेथे होत्या. एक म्हणजे 'बरा होशील' हे बाबांचे वचन. दुसरे म्हणजे एक दिवसाआड लाभणारा बाबांचा प्रत्यक्ष सहवास.

मशीदमाई तेथून जवळच. पण तेथे येण्याची त्याला मनाई. तरी त्याचे दैव असे बलवत्तर की चावडीत आपल्या पथारीवर पडल्या पडल्यासुद्धा सकाळी भिक्षेस निघते वेळी आणि पुन्हा संध्याकाळच्या फेरीच्या वेळी बाबांचे दर्शन त्याला अनायासे घडावे!

बाबा रोज सकाळी भिक्षेस या चावडीवरून जात. संध्याकाळी चावडीसमोर उभे राहून, मान डोलावून आणि तर्जनी हलवून दशदिशांना वंदन करीत. ज्या दिवशी बाबा चावडीत झोपत त्या दिवशी तर त्या अमीरापासून ते फक्त दोनच हातावर असत. मध्ये नावाला फळ्यांचे एक दार!

दोघानाही गप्पागोष्टींची आवड. साहजिकच ते दारही नेहमी उघडे.

त्या इंग्रज गृहस्थांच्या डोळ्यासमोर चावडीचा शिरडीतील तो नयनरम्य सोहळा उभा राहिला.

ज्या दिवशी बाबा चावडीत झोपायला जात त्या दिवशी भजनी मंडळी द्वारका-माईसमोर अंगणात जमत. दोनप्रहरपर्यंत भजन करीत.

मागे रथ, आहे. दक्षिणबाजूला तुळशीवृंदावन आहे. समोरच बाबा बसलेले आहेत. सभामंडपात भाविक स्त्रीपुरुष भजनात रंगले आहेत.

कोणाच्या हाती टाळ. कोणाच्या हाती चिपळ्या. कोणाच्या हाती खंजिरी. कोणाच्या हाती दुमदुमणारा मृदुंग, पखवाज.

कोणी अंगणात दिवट्या पाजळीत आहेत. कोणी पालखी शृंगारीत आहेत. कोणी भालदार—चोपदार सज्ज होऊन बाबांच्या नावाच्या ललकाऱ्या देत आहेत.

बाहेर रस्त्यावर मखरे, कमानी उभ्या आहेत. सुंदर मंगल तोरणे वाऱ्याबरोबर झुलत आहेत. आकाशात निशाणे फडकत आहेत.

दिव्यांचा लखलखाट. स्त्रिया—मुले यांच्या वस्त्राभूषणांचा झगझगाट. बाबांच्या शामकर्ण घोड्याचे साजशृंगारासह अंगणात येणे. मोठ्या ऐटदारपणे गळ्यातील साख-ळ्यांचा आणि पायातील तोड्याचा आवाज करीत मागे—पुढे होणे...

या सोहळ्याचे वर्णन किती करावे ? ज्यांनी तो प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला, ते धन्य !

अशा या वेळी तात्या कोत्यांनी यावे. काखेत हात घालून बाबांना उठवावे. म्हणावे, "मामा, उठा. आपली चावडीकडे जाण्याची वेळ झाली. ते बघा, लोक खोळंबले आहेत."

मग बाबानी आज्ञाधारकपणे उठावे. चिलीम, तंबाखू घ्यावी. आपला लाडका सटका काखेला मारावा. खांद्यावर एक फडका टाकून तयार होऊन उभे राहावे.

यानंतर तात्यानी पुढे व्हावे. बाबांचा जरीकाठी सुंदर शेला कफनीवरून त्यांच्या अंगावर घालावा. अंगावर, डोक्यावर तो सारखा करावा. मग बाबांनी तेथील दिवा विझवावा आणि म्हणावे, "चला."

बाबा निघाले की वाद्ये वाजू लागावीत. कर्णे, तुताऱ्या, तास,झांजा यांचा एकच नाद सर्वत्र भरून राहावा. मृदंग–वीणा यांच्या मंद स्वरात साईनामाचा जयघोष सुरू व्हावाः सच्चिदानंद सद्गुरु साईनाथ महाराज की जय !

तात्याबांनी डावा हात धरला आहे. म्हाळसापतींनी उजवा हात धरला आहे, बापूसाहेब जोगांनी डोक्यावर छत्री धरली आहे.

लोक रस्त्यावर बाबांच्या पायाखाली शेले–दुशेले यांच्या पायघड्या अंथरत आहेत. बाबांवर चवऱ्या ढाळीत आहेत.

पुढे बाबांचा शामकर्ण घोडा, मागे आनंदभराने भारावून चाललेली भजनी मंडळी. असे सुंदर दृश्य पाहाण्यासाठी अमीर–उमरावसुद्धा जीव टाकीत. तेथे सामान्य भक्तांची काय कथा !

अमीर शक्करचे मन तर त्या दृश्यामुळे वेडावून जाई.

तात्याबा, म्हाळसापती, शामराव, बापूसाहेब जोग या बाबांच्या निकटवर्ती मंडळींचा त्याला हेवा वाटे.

तात्याबा चावडीत वर येऊन आधी बाबांसाठी उत्तम आसन घालीत. त्यांना धरून लोडाशी बसवीत. बापूसाहेब जोग बाबांचे पाय चांदीच्या ताम्हनात ठेवून त्यांची पूजा करीत. मग शामराव बाबांची चिलीम तयार करीत. ती तात्याबा, बाबा, म्हाळसापती, शामराव अशी फिरून पुन्हा बाबांच्या हाती येई.

केशर–कस्तुरी यांचा घमघमाट. दिव्य वस्त्रे-अलंकार यांचा झगझगाट. पंचरतींचा सुंदर थाट–हे सर्व दृश्य पाहून त्या अमीर शक्करचे डोळे आनंदाने भरून येत.

तरीही त्याला वाटे : बाबांनी मला येथे असे डांबून का ठेवावे ? ही शिक्षा मी किती दिवस भोगावी ? ती कधीच संपणारे नाही काय ? माझ्या बायकामुलांत मी कधीच परत जाणार नाही काय ?

एक दिवस बाबांचा हा तुरुंग त्याला अगदी असह्य झाला. बाबांच्या धाकाची सर्व बंधने त्याने तोडली. ओलीमुळे आपले सांधे धरले आहेत हेही तो विसरला.

तुरुंगातून पळून जाताना कोणी कधी परवानगी घ्यायची असते काय, असा त्याने स्वतःला सवाल केला. चावडीतून उठला आणि थेट या कोपरगावचा रस्ता धरला.

येथे धर्मशाळेत येऊन कोठे टेकतो न टेकतो तोच त्याला एका कोपऱ्यात एक मरणोन्मुख फकीर दिसला. तहानेने तो फकीर व्याकूळ झाला होता. अति दीनवाणा, केविलवाणा चेहरा करून गयावया करीत खुणेने तो फकीर म्हणत होता, "भाई, थोडा पानी...पानी पिलाव."

अमीर शक्करने त्याला पाणी पाजविले.

आणि त्याच क्षणी त्या फकिराने मान टाकली. तो गतप्राण झाला.

रात्रीची वेळ. जवळपास कोणीही नाही. एक ते प्रेत आणि तो !

अमीर विचार करू लागला : आता काही तासांनी सकाळ होईल. पोलिस येथे येतील. खुनी इसम म्हणून मुद्देमालासकट मला पकडतील !

कायद्याला दयामाया नाही. खरे खोटे समजत नाही. ज्याच्या हाती ससा तो पारधी. तुरुंगाची हवा तो खाणार !

अमीर शक्कर तेथून उठला. त्याने बाहेर अंधारात धूम ठोकली.

सुखाची ती चावडी सोडून येथे पळून येण्याची अवदसा आपणास का आठवली असे त्याला होऊन गेले. पश्चात्ताप झाला.

मागे–पुढे पाहात पाहात, 'बाबा बाबा' असा आक्रोश करीत अमीर शक्कर शिरडीच्या दिशेने धावू लागला. शिरडी कधी एकदा येईल असे त्याला होऊन गेले.

शेवटी एकदाची शिरडी आली. ती चावडी आली.

चावडी पाहून अमीर शक्करचा जीव भांड्यात पडला.

डोळे पुसत तो म्हणाला, "बाबांची आज्ञा होईपर्यंत या चावडीतून मी आता हलणार नाही. मग माझे काहीही होवो."

तो इंग्रज मनुष्य विचार करू लागला : बाबांनी या श्रीमंत अमीर शक्करला कुत्री, भिकारी आणि महारोगी यांच्या संगतींत नऊ महिने असे डांबून का ठेवले असेल बरे ?

त्यांचे दुःख, त्यांची वेदना अमीर शक्करला कळावी म्हणून ! त्याचे मन अंतर्मुख व्हावे म्हणून ! राजैश्वर्याच्या उशाशीच नरक कसा चिकटून असतो याचे ज्ञान त्याला व्हावे म्हणून !

श्री नानासाहेब चांदोरकर मला म्हणाले होते : प्रत्येक मनुष्याला कर्मविपाक-सिद्धांतानुसार गुन्ह्याच्या प्रमाणात शिक्षा आहे.

या अमीर शक्करने श्री चांदोरकर म्हणतात त्याप्रमाणे पूर्वजन्मात कोणाचे अन्न तर हिरावून घेतले नसेल ! त्यामुळे तर त्याचा हा वातविकार, पोटशूळ बळावून त्याचा देह अस्थिपंजर झाला नसेल !

बाबांनी मला अंगणात बसवून ठेवले. वर येऊ दिले नाही.

हिंदी लोकांबद्दल मी मनात तुच्छतेचा भाव बाळगला; आपल्या बैठकीस त्यांना बसू दिले नाही; त्यांच्याशी तुटकपणे वागलो; फटकून वागलो. याची जाणीव तर बाबांनी या कृतीमुळे मला दिली नाही! सर्व मानव ही एका त्या प्रभुची लेकरे, असे एकीकडे तोंडाने बडबडत, मानभावीपणाने मी वागलो त्या दंभाबद्दल शिक्षा म्हणून तर बाबांनी या आजारीपणाच्या निमित्ताने मला येथें डांबून ठेवले नाही! याचि देही याचि डोळा असा दैवी न्यायाचा तर हा प्रकार नव्हे!

पोटी कितीही दया असली तरी न्यायदेवतेला कठोर व्हावे लागते. न्यायाच्या प्रतिष्ठेसाठी धाक निर्माण करावा लागतो.

क्षणोक्षणी चाललेली गुरुपदाची – या दैवी न्यायाची अप्रतिष्ठा थांबवून गुरुपदाचे सर्वोच्च न्यायालय पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी तर हा धाक बाबांनी निर्माण केला नाही!

असे असले तरी ही मशीदमाई मनाची फार कोवळी आहे. भोळ्या भाविकांची ही माय अति कनवाळू आहे. ज्या लेकराने तिच्या मांडीचा आश्रय एकदा घेतला, त्याला ती कधीही अंतर देणार नाही. दुःखाचा, चिंतेचा वारा ती त्याला लागूही देणार नाही. ती त्याला त्याच्या सर्व अपराधांसह आपल्या पदराखाली झाकील. म्हणेल, ही माझी लेकरे आहेत. सच्चिदानंद श्रीहरीची ही सारी रूपडीच आहेत."

त्या इंग्रज अधिकाऱ्यांच्या ध्यानी आता आले की रागाच्या वेळी तप्त लोह-गोलाप्रमाणे दिसणारे बाबांचे ते डोळे; तात्याबाचे मानगूट पकडणारे, भागोजीला मुष्टिमोदक देणारे, माधवरावाला विटांचा प्रसाद देणारे ते हात; समोर दिसेल त्यावर शिव्याशापांचा वर्षाव करणारे ते मुख – हे सर्व अवयव एका प्रेमळ मातेचे आहेत. लेकरांवरील असीम प्रेमामुळे निर्माण झालेला हा क्षोभ आहे. बाह्यतः तो खरा वाटत असला तरी अंतर्यामी तो खोटा आहे. वाऱ्यामुळे समुद्रावर उठलेल्या लाटांप्रमाणे तो केवळ क्षणजीवी आहे.

बाबांच्या या सत्यदर्शनामुळे त्या इंग्रज गृहस्थांचे मन एका क्षणात शांत झाले. स्वतःशी ते म्हणाले : हा अपघात, हा आजार, ही डांबणूक हा सर्व बाबांच्या वात्सल्याचाच खेळ आहे. दुसरे काय?

● ● ●


# संत मासिकांचा बादशहा

## श्रीसाईलीला – दिवाळी अंक १९७४

**ऐन दिवाळीत श्रीसाईभक्तांच्या भेटीस येत आहे.**

**श्रीसाईबाबांच्या सहवासातील आजचे थोर संत श्री कमूबाबा यांची रंजक मुलाखत वाचा.** — लेखक – सदानंद चेंदवणकर

# श्री. गोंदवलेकर महाराज व्यक्तिदर्शन

• पु. मु. अत्रे

## बिदरहळ्ळी येथे रामस्थापना

श्रीब्रह्मानंदांनी बिदरहळ्ळी या गावी रामाची स्थापना करण्याला श्रीमहाराजांना आमंत्रण केले. ते कोणत्या परिस्थितीत निघाले हे उपलब्ध पत्रावरून कळेल. पत्र बापूसाहेब साठे यांना लिहिलेले आहे. त्यातील मजकूर असा : "विशेष लिहिण्याचे कारण की, मी ब्रह्मानंदबुवांकडे प्राणाच्या करारावरोबर जीविताची आशा सोडून आलो आहे. दररोज चार डिग्री ताप येतो. श्वास फार झाला आहे. अन्न खाववत नाही. जिना चढून जाण्याची शक्ति उरली नाही. असे झाले आहे; परंतु भागवतांनी (डॉ. कुर्तकोटी) व ब्रह्मानंदबुवांनी तेरा कोटी जप केला आहे. याशिवाय, दोन ठिकाणी श्रीरामाच्या स्थापना होणार आहेत. येवढ्यासाठी देह गेला तरी हरकत नाही असे समजून मी आलो आहे. माझ्याबरोबर सुमारे तीनशे मंडळी आहेत. ..." तेथे चार दिवस राहिले. त्यांच्या हातून जपाची सांगता व रामाची स्थापना झाली.

## सोलापूरला रामस्थापना

श्रीमहाराज सोलापूरला आले व तेथे भाऊसाहेब जवळगीकर यांनी बांधलेल्या मंदिरात रामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. एक फोटोग्राफर श्रीमहाराजांचा फोटो घेण्यास आला. त्याला ते म्हणाले, "फोटोवर चांगले पैसे मिळावेसे तुला वाटत असेल तर आज फोटो काढू नकोस. पुढे बघू." पण तो थांबेना. शिवाय भाऊसाहेब केतकर म्हणाले, "आपणाला पुन्हा वेळ येईल की नाही याची शंका आहे. आपण आजच फोटोला बसावे." तेव्हा दोन्ही बाजूस टोपीवाले साहेब हात जोडून उभे आहेत असा श्रीमहाराजांचा फोटो घेतला गेला. पण फोटोग्राफरने काच धुवून पाहता दोन्ही साहेब दिसले व श्री महाराजांची प्रतिमा उठलीच नाहीं. तो ती काच घेऊन श्री महाराजांकडे आला व त्याने साष्टांग नमस्कार घालून क्षमा मागितली. दुसऱ्या दिवशी त्याने पुष्कळ फोटो घेतले, पण पहिला फोटोच पुढे फार प्रसिद्ध झाला.

## पंढरपूरच्या बडव्यात समेट

सोलापूरहून श्रीमहाराज कुर्डुवाडीला गेले व दोन दिवस मुक्काम झाल्यावर एकाएकी पंढरपूरला जाण्यास निघाले. तेथे विशेष काही आहे काय असे विचारता ते म्हणाले, "पांडुरंगाने काल मला सांगितले की, बडव्यांच्या मध्ये पूजेच्या हक्कदारीचा तंटा झाला आहे व त्यामुळें पांडुरंगाची आबाळ होऊन पूजा केली जात नाही. ते भांडण सोडविले पाहिजे." एका बडव्याने कलेक्टराकडे लेखी तक्रार केली व धार्मिक

बाबतीत श्री महाराजांनी निर्णय द्यावा अशा आशयाचे पत्र कलेक्टरांनी श्री महाराजांना रवाना केले. श्री महाराज निघाले त्याच वेळीं तें त्यांना मिळाले. त्यांनी सर्व बडव्यांना बोलावून तंट्याचे स्वरूप ऐकून घेतले. देवाचे दागिने व वस्त्रे लांबविल्याचा आरोप होता. बडव्यांमध्ये समाधानकारक समेट केल्यावर पांडुरंगाची सेवा-अर्चना पहिल्यासारखी होऊ लागली.

## अखेरचे वर्ष : गोंदवल्यास वाढविलेल्या सोयी

१९१२ साल उजाडले. श्रीमहाराजांची दैनंदिनी होती तशीच होती. पण प्रकृति मात्र क्षीण होत होती. श्वास वरचेवर लागे व पायाची सूजही ओसरत नव्हती. तरी चार एक दिवसांनी बताशा जास्त मस्ती करू लागला की त्याला रपेट करून आणावा लागे. लांबून लांबून लोक दर्शनाला येऊ लागले होते. रोज पाचशे तरी लोक असत. त्यांच्या सोयीसाठी विहिरी, ओढ्यावर घाट व एक मोठी धर्मशाळा बांधून पाकशाळाही वाढविली व जुन्याची डागडुजी केली. पंढरपूरच्या ज्योतिषानें त्यांना साडेसाती आहे असे सांगितले. श्रीमहाराज म्हणाले, " मग त्याचे काय ! ती आपल्या वाटेने जाईल बिचारी ! " ज्योतिषाने म्हटले, " पण महाराज, इतराना तरी शनिदेवाची उपासना करावयास पाहिजे. तेव्हा एक देवालय बांधले तर बरे होईल असे वाटते. " हे श्रीमहाराजांना पटले व या ' देवाच्या फौजदाराचे ' देवालय धर्मशाळेजवळ बांधले. त्यांनी नवीन शेते घेतली, मृत्युपत्र तयार केले व धार्मिक संस्थान स्थापून स्वार्जित आणि वडिलार्जित एकुण एक मिळकत त्याला अर्पण केली. पंचांची नावे व प्रत्येकाची जबाबदारी आखून त्याची स्पष्ट कलमे मृत्युपत्रात समाविष्ट केली. आल्यागेल्याला आमटी भाकरी द्यावी व सर्वांनी नाम घ्यावे हे मुख्यत्वे नमूद केले. भेटण्यास आलेल्या प्रत्येकास ते एक दोन दिवस जास्त राहवून घेत होते व निरोप देताना कळकळीने सांगत, " मी सांगितलेले नाम विसरू नका. त्यात तुमचे कल्याण आहे. मी आता नैमिषारण्यात जाणार आहें. तेव्हा आपली भेट परत होईल असे नक्की सांगता येत नाही. " जे अध्यात्माचा अभ्यास करीत होते त्यांना सांगत, " कोणतीही शंका मागे न ठेवता त्याचे समाधान करून घ्या व नामस्मरण सतत ठेवा. वेळ सांगून येणार नाही ! " जे त्यांच्यावर विसंबून नुसते दिवस घालवीत होते, त्यांना म्हणायचे, " पहा बरे ! मी पक्ष्यासारखा केव्हा उठून जाईन त्याचा नेम नाहीं. नामाला लागा. " आणि समजूतदार लोकांना ते भवितव्य सांगत, " अजून काहीच झाले नाही. यापुढे कली फार मातेल. लोक कमालीचे विषयांध होतील. नीति–न्याय राहणार नाही. चांगले चांगले साधू देखील भ्रष्ट होतील. पण नामाची कास धरील त्याला मात्र डंक लागणार नाही. तुम्ही नाम सोडू नका. "

## रामनवमीचा उत्सव

शके १८३५ ( सन १९१३ ) मध्ये श्रीमहाराजांच्या हाताने झालेली रामनवमी ही शेवटची. सर्व मंडळींना उत्सवाची पत्रें लिहिली व प्रत्येक पत्रात, " मी

नैमिषारण्यात जाणार आहे. तत्पूर्वी तुम्हाला एकदा पहावेसे वाटते" हा मजकूर टाकला होता. जवळ जवळ ५०० मंडळी जमली. नऊ दिवस अखंड नाम स्मरण, कीर्तन भजन इत्यादि चालू होते. श्रीमहाराजांच्या त्या लहानशा खोलीत माणसे दाटीने उभी रहात व दर्शन झाल्यावर प्रेमाने त्याच्या पाठीवरून हात फिरवून ते सांगत, "बाळ, भगवंताने जसे ठेवले आहे त्यात समाधानाने राहून त्याचे नाम कधी विसरू नये. नामात राहणारा मनुष्य रामाजवळ असतो व तो आपले कल्याण करून घेतो हे माझे सांगणे चित्तात निरंतर ठेवा." नवमीच्या दिवशी दोन्ही मंदिरात अपरिमित गर्दी झाली. पारण्याला दहा हजार मंडळींनी प्रसाद घेतला. श्रीमहाराज स्वतः आग्रह करकरून वाढीत होते.

रात्री पालखी निघाली. अयोध्याधीश रथात शोभायमान दिसत होते. नाना प्रकारची वाद्ये आणि भक्तांचा जणु महासागर संथपणे, हिलालाच्या प्रकाशात व दारूकामाच्या रोशणाईत सरकत होता. श्रीमहाराजांनी थोडा वेळ रामरायावर चवरी धरली होती. दशमीला श्रीमहाराजांना प्रचंड अहेर झाला. द्वादशीपासून मंडळी निघाली. प्रत्येकाला श्रीमहाराजांनी 'आपली आठवण' म्हणून काही ना काही दिले व मुख्यतः नामस्मरणाची निरंतरची आठवण दिली.

## दादा, मी पुढे जातो

रामनवमीपासून अप्पा श्रीमहाराजांच्या मागे मागे राहू लागला. आताशी तो काही सूचक व काही गूढ असे मधून मधून बोले. एक दिवस विश्वनाथ ओढ्यावर स्नान करीत होता. आप्पा तेथें येऊन म्हणाला, "अरे विश्वनाथ, गोंदवल्या भोंवती मला जाळ दिसतो आहे. दादा फार दिवस राहाणार नाहीत. पण तुझे फार चांगले होईल." गुरुवारच्या बाजारात बेळगावच्या काही बायका बाजारात फिरत असता त्यांना अप्पा दिसला. तेव्हा ताई म्हणाली, "अप्पा, इथे काय करतोस रे!" तो बोलला, "घ्या. घ्या! लुटा.! लुटा! गोंदवल्याचा बाजार उठण्याची वेळ आली." एके दिवशीं अकरा वाजता अप्पा राममंदिरात आला. श्री महाराजांनी त्याच्याकडे निरखून पाहिले व सांगितले, "जा. काही हरकत नाहीं. पण आज रामाचा प्रसाद खाऊन जा." त्यांनीं अप्पाला आपल्या जवळ जेवायला बसवले. तो त्यांना कधी नमस्कार करीत नसे. पण आज तीर्थ घेतल्यावर जेवणाचे आधी त्याने साष्टांग नमस्कार घातला. दुसऱ्याच दिवशी त्याने नदीकाठीं देह ठेवला.

श्री महाराजांचे बोलणे फार सूचक झाले होते, परंतु त्यांची आनंदी मुद्रा, विनोदी वृत्ति व देहाला वाटेल तसे राबवून घेण्याचा करारीपणा यामुळे त्यांची निर्वाणीची भाषा ऐकणाराला एक विनोदच वाटत असे. तथापि दिवसे-दिवस ते झपाट्याने थकत होते. एका रात्री झोपलेले लोक शिरस्त्याप्रमाणे पाहून मंदिरात आल्यावर भाऊसाहेब केतकरांना ते बोलले, "छे बुवा, थकलो! काय हो भाऊसाहेब, हे सगळे मला सांगतात की, 'आम्ही तुमची सेवा करण्यासाठी आलो आहोत,' पण

मलाच वास्तविक त्यांची सेवा घडते आहे. औषध, पाणी, अंथरूण-पांघरूण, जेवण-खाण, भांडण-तंटे, सोई-गैरसोई अशा अनेक रंग-ढंगात त्यांचीच सेवा मला करावी लागते. म्हणतात ते खोटे नाही, देवाची सेवा फार सोपी व एकमार्गी पण गुरूची सेवा फार खडतर! स्पष्ट सांगायचे तर खरा शिष्य नाथ-कल्याणासारखा दुर्मिळ आहे. देहबुद्धि गेल्याशिवाय गुरुसेवा होत नाही आणि गुरुसेवेत देह झिजविल्याशिवाय देहबुद्धि जात नाही." येथे त्यांनी तुकाभाईंनी आपल्या-कडून कशी सेवा करवून घेतली याबद्दल एकदोन गोष्टी सांगितल्या. गोष्टी सांगता सांगता श्रीमहाराजांची छाती भरून आली. ते उद्गारले, "भाऊसाहेब, काय सांगू! तुकाभाई सारखा संत भाग्यात असेल त्यांनाच भेटेल. त्यातच ते गुरु मिळणे तर परमभाग्यच होय. हा गोंदवल्याचा पसारा त्यांचा आहे.. त्यांच्या आज्ञेने मी वागतो. ही परमात्म्याची कृपा आहे या पामरावर!"

## पंढरपूरचा मुक्काम

सन १९१३ च्या मे महिन्यात श्रीमहाराजांनी विठ्ठलाच्या दर्शनाला यावे असे आग्रहाचे पत्र एका बडव्याने धाडले. श्रीमहाराज जूनमध्ये १०० मंडळी घेऊन पंढरपूरला गेले व आपल्या राममंदिरात राहिले. रोज ते विठोबाच्या दर्शनाला जात होते. काही दिवसांनी गुरुपौर्णिमा आली. हा गुरुपूजनाचा सोहळा न विसरण्या-इतक्या थाटाने झाला. श्रीब्रह्मानंद पुष्कळ मंडळी घेऊन आले होते. पूजनाच्या वेळी श्रीमहाराज अगदीं शांत बसले होते. नंतर त्यांनी मंडळींना बसावयास सांगून ते बोलले, "बाळांनो, एका भगवंताच्याच आज्ञेने चालणारा पण एरवी सर्वतंत्र स्वतंत्र असा काळ आपला देह नेऊ शकतो, पण भगवंताचे नाम नेण्याला तो असमर्थ आहे. म्हणून तुम्ही नाम घ्यावे. प्रपंच चतुरतेने करावा पण त्यांतील भगवंत विसरू नये. राम कल्याण करील हे दृढ बाळगा" बोलताना श्रीमहाराजांना भरून येत होते. व श्रोत्यांचे डोळे टिपकत होते.

## "या बरं बाळ!"

श्रीमहाराज पंढरपूरला येऊन चार महिने होऊन गेले. तेव्हा श्रीब्रह्मानंदांना घरी जाण्याची अनुज्ञा मिळाली. त्यांना निरोप देण्यासाठी श्रीमहाराज त्यांच्याबरोबर मंदिरा-बाहेर आले व एका कोपऱ्यापाशी उभे राहिले. तेथे ते ब्रह्मानंदांशी दीड तास बोलत होते व नागप्पाला पहाऱ्यावर दूर राहण्यास सांगितले होते. आपल्या आयुष्यात केलेल्या कार्याचा साद्यंत इतिहास सांगून 'आपण लौकरच शांत होणार' हे शब्द बोलताच ब्रह्मानंदांच्या काळजात चर्र झाले व त्या वैराग्यशील पुरुषाच्याही डोळ्यांतून घळघळ अश्रू वाहू लागले. मुग्धपणे त्यांनी श्रीमहाराजांच्या चरणांवर मस्तक ठेवले व इतका वेळ खालच्या मानेने हात जोडून ऐकणाऱ्या त्या प्रिय शिष्याने त्यांना डोळे भरून पाहिले व वळून ते टांग्यात बसले. "या बरं बाळ" हा निरोप देताना श्रीमहा-राजांची छाती भरून आली होती. यानंतर श्रीमहाराजांनी फक्त ६० मंडळी ठेऊन

इतराना आळीपाळीने घरी पाठविले.

चार सहा दिवसांनी कुरवलीच्या दामोदरबुवांनी राममंदिर पाहाण्यास येण्याचे आमंत्रण केले. अनायासे तिथल्या शंकराचेही दर्शन घडेल असा विचार करून श्रीमहाराज मंडळी घेऊन गेले. येथेही त्यांचे भक्तिभावाने स्वागत झाले. पुष्कळ अन्नदान व भजन-कीर्तनाचे कार्यक्रम उत्तम झाले. श्रीमहाराजांनी बुवांना धन्यवाद दिले व अशीच उपासना चालवून नामाचा प्रसार करण्याची आज्ञा केली.

**या पुढील काळ कसा जाईल ?**

अलीकडे वर्षभर श्रीमहाराज लोकांना सारखे सांगत की, "संभाळा रे बुवा! यापुढे दिवस फार वाईट येणार आहेत, स्वार्थ फार बोकाळेल. महागाई फार वाढेल, अनीती स्वैर संचार करील, माणुसकी समानतेच्या मुलाम्यात गडप होईल. भगवंताचा पूर्ण विसर पडेल व रोगराई फैलावेल!" 'केसरी' आला म्हणजे श्रीमहाराज म्हणायचे, "अरे बघ, कुठे लढाई सुरू झाली का ? वाच!" यावर भाऊसाहेब केतकर एकदा म्हणाले, "महाराज आपण न विसरता लढाईच्या बातम्या वाचण्यास सांगता, तेव्हा खरोखरच लढाई लौकर होणार आहे की काय ? श्रीमहाराज गंभीर होऊन बोलले, "भाऊसाहेब, येणारी पन्नास-साठ वर्षे अखिल जगाला फार जाचक व तापदायक जाणार आहेत. जगात लढाया झाल्या नाहीत किंवा होणार नाहीत असे मुळीच नाही; पण भविष्यात ज्या लढाया होतील त्यांत माणसांची व संपत्तीची इतकी जबर हानि होईल की त्याचा हबका सबंध जगाला बसेल. लढाईचे तंत्र सुद्धा कल्पनेच्या बाहेरचे असेल. कौरव-पांडवांच्या युद्धात जशी अस्त्रे होती तशी यांत्रिक अस्त्रे वापरली जाऊन ती जग खाक करून टाकतील. देहाचे भोग व एक दिवस मरण येवढेच काय ते मानवाचे ध्येय असेल. दोन पिढ्यात भारताला स्वराज्य मिळेल, पण त्याचे परिणाम परतंत्र राज्यापेक्षाही अत्यंत जाचक होतील. मुख्यत्वे देवधर्म व आचार-विचार हे वणव्या-सारखे नामशेष होतील. आपल्या गुरूला काही अक्कल नाही असा प्रचार करणारा शिष्यवर्गच जगात मान-मान्यता पावून आजवर गुण्यागोविंदाने व स्थैर्याने राहणारा समाज विस्कळित होईल. खाणेपिणे, कुटुंब धारणेची शुद्धता व विषयसेवन यांना मुळीच धरबंध राहणार नाही. इतकेच नव्हे तर जो संयमाने वागेल त्याची धूळधाण होईल. जन्मल्यापासून मरेपर्यंत, इंद्राचे ऐश्वर्य असूनही, असमाधान वाट्यास येईल. पशु-पक्ष्यांपेक्षाही अनिर्बंध असे विषयसेवन व तशीच भ्रूणहत्या पावलोपावली चालेल. आत्महत्या करणे ही सहज गोष्ट होईल. पुढारीपणाच्या मुलाम्याने झगमगणारे लोक साध्या लोकांचे रक्त शोषण करतील व नीचवृत्तीच्या नरराक्षसांचे जिवलग होतील. स्त्री किंवा पुरुष यात कमी अधिक न दिसता उलट त्यांच्यात अहमहमिका वाढेल. पूर्वी माणसांची बुद्धि तरी शाबूत होती, पण भविष्यात तीच मुळी भ्रष्ट होईल. दृश्यापेक्षा सूक्ष्मातील संकटे व आघात निस्तरणे अत्यंत दुर्घट असते म्हणून भगवंताच्या नामाचा आश्रय बळकट ठेवावा. कडाक्याची थंडी पडली तर ती

नाहीशी करण्याचा शहाणपणा न मिरवता मुकाट्याने बंडी घालावी, म्हणजे तीपासून संरक्षण होते. जगाचा जीवनप्रवाह भलत्या मार्गाने जाऊ लागला तर आपल्यासारख्या सामान्य माणसाने त्याला बांध घालण्याच्या भरीस न पडता भगवंताच्या नामाला बिलगून रहावे. या प्रवाहात आपणही थोडा काल गोते खाणारच, पण नामाच्या आधारामुळे आपले डोके प्रवाहाच्या वर राहील. ते बुडणार नाही, याची खात्री धरावी. तुम्ही सर्वांनी नामामृतात मस्त रहावे. राम संभाळीलच." ऐकणाऱ्या आठ-दहा श्रोत्यांना श्रीमहाराजांचे भाषण पूर्ण होईतो असे भासत होते की प्रत्यक्ष श्रीवशिष्ठ गोंदवल्याच्या रामरायाला कलियुगातील जगाचे भविष्य सांगत आहेत. यांच्यामध्ये अम्मा बसली होती. तिच्यावर थिऑसॉफीचे संस्कार झाले होते. तिला न राहवून ती बोलली, "महाराज, भविष्याची रूपरेखा जर अशी आहे तर आपण शांत होण्याची घाई का करता? आपणाला हा प्रवाह सुमार्गाला लावावा असे वाटत नाही. काय?" यावर श्रीमहाराज हसले व म्हणाले, "माय, तुमचा प्रश्न फार मार्मिक आहे. पण कोणाही माणसाला देहधारणेच्या मर्यादेत जडाचे नियम पाळावे लागतातच. साक्षात् परमात्मा श्रीकृष्णाला देहधारणेत दुर्योधनादिकांची व आपल्या प्रत्यक्ष पुत्रांचीहि बुद्धि पालटता आली नाही. पण देह सोडल्यावर सूक्ष्माच्या साम्राज्यातून जगाची बुद्धि पालटण्यात त्यांना पुष्कळ यश आले. शिवाय संकल्पित अवतार-कृत्य पूर्ण झाल्यावर आणखी जास्त या कलहजगात राहण्याची त्यांची इच्छा नसते—समजले ना?"

## संस्कृति व सुधारणा म्हणजे काय?

महाराज म्हणत, भगवंतच कल्याणाचे निधान आहे. म्हणून ज्या कृतीच्या आरंभी, मध्ये व शेवटी भगवंत भरलेला आहे तीच कृति संस्कृति होय. त्याचप्रमाणे सुधारणा म्हणजे जी गोष्ट अंगीकृत केली गेली ती कल्याणप्रद असली पाहिजे. अर्थात् ज्याने भगवंताचे नाम अंतरात धारण केले आहे तोच खरा सुधारलेला. विज्ञानाबद्दल बोलताना श्रीमहाराज म्हणाले, "विज्ञानाच्या आधाराने निर्माण झालेल्या कृति या सुधारणा नसून नवीन सोयी आहेत. त्यामुळे देहाला सुख मिळतेसे वाटते. पण जीव जास्त जास्त परावलंबी होऊन देह सुद्धा दिवसेदिवस आपल्या ताब्यात राहीनासा झाला आहे. खरे सुख मनाच्या अवस्थेवर आधारित असल्याने भौतिक सुधारणांनी मनुष्य सुखी होणार नाही व त्याची कडू फळे आणखी पन्नास वर्षांनी खाण्याचा प्रसंग येणार आहे. देहाला सर्वस्व मानून आत्म्याची कुचंबणा करणे हे आत्मघातकी लक्षण आहे. ही मानवांची सुधारणा खास नाही. याने मनुष्य सुखी होणार नाही. परंतु प्रपंचाची एकमेव लालसा न ठेवता प्राप्तस्थितीत समाधान मानून आपण आपला काल जर भगवंताच्या नामात गुंतवला तर मत्सर, लोभ, क्षोभ इत्यादि अगदी सौम्य होऊन सामान्य मनुष्य खरा सुखी होईल."

## महासमाधि : शेवटची दत्तजयंती :

दत्तजयंतीला श्रीमहाराजांना सकाळपासून दम्याने चांगलेच पछाडले होते. तरी

जन्माच्या वेळी ते मंदिरात आले. श्रीदत्ताच्या पाळण्यावर फुले–गुलाल उधळल्यावर बाळंभटांनी त्यांना तीर्थ दिले त्यावेळी श्रीमहाराज म्हणाले, "बाळंभट, अशीच भगवंताची सेवा करीत असावे. तुमच्या हयातीत तुम्हाला काही कमी पडणार नाही." ते बोलले, "महाराज आपण असल्यावर मला कमी काय पडणार?" श्रीमहाराज बोलले, "कोणास ठाऊक मी किती दिवस आहे? रामाने बोलावले की मी जाणार!" श्रीमहाराज झपाट्याने थकत चालले होते. हृदयाची धडधड तर कित्येक दिवसापासून चाललेली होती. पण अगदी चार दिवसातच ते देह ठेवतील अशी कोणाला कल्पना असणार? दम्याचा सारखा जोर झाल्यापासून ते एक दोन वेळच वाटीभर लापशी घेत होते. पायावरच्या सुजेमुळे दुसऱ्याच्या खांद्याचा आधार घेऊन ते मोठ्या कष्टाने उभे राहात होते. अंधार पडल्यावर ते राममंदिरात आले व खोलीत पलंगावर पडले. भागवत दाराशी हात जोडून उभे होते. महाराजांनी त्यांना आत बोलावून दार लावण्यास सांगितले व एक तासभर एकांतात त्यांना आपल्या कार्याचा साद्यंत इतिहास सांगितला आणि पुढे बोलले, "पहा! राम किती दयाळू आहे. त्याच्या नामाचा प्रसार व्हावा म्हणून त्याच्या नावाने मी हा बाजार मांडला. तेव्हा आपला माल खपेल की नाही याची मला शंका होती. पण रामाच्या कृपेने पुष्कळ लोक नामाला लागले. तुम्ही विद्वान आहांत व नामावर तुमचे प्रेम आहे. माझा आता भरवसा नाही, म्हणून तुम्ही येथे राहून लोकांना नामस्मरणाला लावावे. राम तुमचे कल्याण करील."

## रामाची चिठ्ठी आली आहे परत येण्याची :

गुरुवार दि. १८ डिसेंबर १९१३ या दिवशी सकाळी प्रातर्विधी झाल्यावर श्रीमहाराज रामरायाचे दर्शन घेऊन सिंहासनावर बसले. सर्व मंडळीकडे एकदा त्यांनी पाहिले व गप्पा करीत आहेत अशासारखे बोलले, "बघा रे बुवा! आमची जागा फार दिवस रिकामी पडली आहे म्हणून रामाची चिठ्ठी आली आहे परत येण्याची, तेव्हा मी जाणार. तुम्हीं आनंदाने मला निरोप द्या व भगवंताच्या नामाला विसरू नका हा माझा निरोप घ्या." श्रीमहाराजांचे हे बोलणे सर्वांना सहज व शिळोप्याचे वाटले. याला कारण असे की, कित्येक दिवसापासून 'मी नैमिषारण्यात जाणार' असे ते सांगत होते. श्रीमहाराज बोलत असताना विश्वनाथ सांगत आला की, बताशा भयंकर मस्ती करीत आहे. लगेच त्या क्षीण स्थितीत सुद्धा ते बताशाकडे गेले. बताशाने खिंकाळून आनंद दाखविला. श्रीमहाराजांनी त्याच्या पाठीवर थाप मारून हात फिरवला व ते परत निघाले तो बताशाने हिसकाहिसकी सुरू केली. तेव्हा ते समजले व त्याला जेव्हा ४–५ मैल रपेट करून आणले तेव्हा कुठे त्याचा जीव शांत झाला. श्रीमहाराज बोलले, "पहा, मुक्या जनावराना देखील माझी अखेरची सेवा घ्यावीशी वाटते. राम कसा सगळीकडे भरला आहे." हृदयाची धडधड, पायावरची सूज, अन्न नसल्यामुळे आलेली क्षीणता, इतके असूनही जर ते चांगलीच रपेट करू शकतात, तर त्यांचे जाण्याचे बोलणे कोणाला खरे वाटणे शक्य होते? तसेच

काही दिवसापूर्वी त्यांच्या गळ्यावर एकाएकीं भराभर फोड उठले होते व गळा सुजून घिप्प झाला होता. पण ते फोड जसे आले तसेच गेलेही होते. आता रपेट झाल्यावर ते मंदिरात आले पण जराही स्वस्थ न बसता त्यांनी दीड तास निरूपण केले! "संतांच्या उपदेशावर विश्वास ठेवून नामस्मरण करावे व सदाचरणाने प्रपंच करावा. असे जो वागेल त्याचे राम खात्रीने कल्याण करील" हे निरूपणाचे सार होते.

**सगळे हिंग-जिऱ्याचे गिऱ्हाईक, केशर-कस्तूरी कोणीच मागत नाही :**

गुरुवारीं संध्याकाळी श्रीमहाराज रामाचे दर्शन घेऊन झाल्यावर भाऊसाहेब केतकरांच्या बिऱ्हाडी गेले. ते एकटे आलेले पाहून पति-पत्नींना आनंद झाला बसता बसता ते भाऊसाहेबांच्या मंडळींना म्हणाले, "बाई, मला फार भूक लागली आहे. काय असेल ते द्या." उभ्या आयुष्यात त्यांनी अमूक एक मला पाहिजे असे आपल्या मातेलाही म्हटले नव्हते. भागवत तर नेहमी म्हणत की, "महान् अधिकारी संताचे, 'आहे, आहे, नाही, नाही' व्रत श्रीमहाराजांच्या रोमरोमी भिनलेले आहे व हेच त्यांचे वैशिष्ट्य प्रत्येकाला मी सांगत असतो." असो. भाऊसाहेब व श्रीमहाराज दोघेच जेवण्यास बसले. जेवताना भाऊसाहेब सहज म्हणाले, "आपण थोडी विश्रांति घ्यावी म्हणजे पुष्कळ बरे वाटेल." श्रीमहाराज किंचित् हसून बोलले, "भाऊसाहेब, या लोकांच्यासाठी खटपट करण्यास कोणी तयार होत नाही हो! हे सगळे हिंग-जिऱ्याचे गिऱ्हाईक आहेत. केशर-कस्तुरी मागणारा कोणीच भेटत नाहीं. प्रत्येकाला प्रपंचासाठी देव पाहिजे, देवासाठी देव मागणारा कोणीच भेटत नाही. तेव्हा अशांनाच आपण तयार करीत राहिले पाहिजे. तरी पण, भाऊसाहेब, मला रामाने पुष्कळ यश दिले आहे. देह कष्टासाठीच असतो. त्याच्या सुख-दुःखाकडे आपण कशाला लक्ष द्यावे!"

## भाऊसाहेब, मी सोमवारीं जाणार

शुक्रवार दि. १९ डिसेंबरला श्रीमहाराज म्हणाले, "भाऊसाहेब, मला आता जाणे जरूर आहे. मी सोमवारी जाणार." हे ऐकून भाऊसाहेबांना धक्काच बसला. ते बोलले, "महाराज, आपल्या मांडीवर मरण येणे म्हणजे एक उत्सवच आहे. माझा अंतकाळ असा व्हावा ही इच्छा धरून मी येथे राहिलो आहे." श्रीमहाराज म्हणाले, "तसा योग दिसत नाही." भाऊसाहेबांनी पुढे विचारले, "मग मी कोठे राहू?" श्रीमहाराजांनी सांगितले, "तुम्ही बारा वर्षे येथेच रहावे." सायंकाळी दमा जोरावला. येवढ्यात कऱ्हाडचा एक जण दर्शनास आला. त्याने श्रीसमर्थांच्या प्रसादाची एक कोरी कफनी आणली होती. ती श्रीमहाराजांनी अंगात घालण्याचा त्याने आग्रह केल्यावरून ती त्यांनी घातली. आणि तसेच रामासमोर भजनाला उभे राहिले. पायावरच्या सुजेमुळे त्यांना उभे राहवत नव्हते, पण कोणाच्या तरी खांद्यावर हात टेकून त्यांनी आधार घेतला होता. रात्री एक वाजेपर्यंत त्यांनीं भजन व निरूपण केले. शनिवारी रात्री श्रीमहाराज पुन्हा कीर्तनाला उभे राहिले. पायाला रग लागली म्हणजे आलटून पालटून पाय उचलीत. पहाटे दोनपर्यंत कीर्तन झाले. निरूपणात देहाची

अशाश्वता, भगवंताची निष्ठा, नामाचे महत्त्व, सगुण रामाचे प्रेम, संतांच्या संगतीची महती इत्यादि विषय अत्यंत परिणामकारक पद्धतीनें सोप्या भाषेत त्यांनी सांगितले.

**मी उद्या सकाळी येथे कोठे आहे ?**

रविवार दि. २१ डिसेंबरला सकाळी श्रीमहाराजांनी आऊताईंना बोलावून सांगितले, "सर्वांना सांगा की भात गावाला गेला ! जी काय भाजीभाकरी असेल ती खाऊन नाम घेत आनंदाने काळ कठावा !" ते खोलीत जाऊन जरा पडले तोच अंताजीपंत आणि काका फडके यांचा मोठमोठ्याने चाललेला आवाज त्यांनी ऐकला म्हणून त्यांना बोलावून विचारले. काका म्हणाले, "महाराज, आपण जवळ नसला म्हणजे हे असे होते." श्रीमहाराज हसून म्हणाले, "अहो, पण उद्या सकाळी मी येथे कोठे आहे ? आपण रामाच्या घरी आहोत ! जे असेल ते गोड करून त्याचा प्रसाद म्हणून घ्यावे. असे भांडण करू नये." सायंकाळी ऊन कलल्यावर श्रीमहाराज गोठ्याकडे गेले. तेथे खिल्लाराकडे डोळे भरून पाहून ते अभ्यंकरांच्या झोपडीजवळ आले व म्हणाले, "ही जागा फार छान आहे. मला कायम येथे रहावेसे वाटते." नंतर पायातल्या खडावा काढून त्या अभ्यंकरांना जपून ठेवण्यास त्यांनी सांगितले. त्या दिवशी मार्गशीर्ष वद्य नवमी होती. अप्पा जरंडीकरांनी उपास सुरू करून तीन दिवस झाले होते. त्यांना महाराजांनी विचारले, "अप्पा, अरे हे उपासाचे वेड तू का म्हणून घेतले आहेस ?" त्यांनी म्हटले, "महाराज, आपणाला बरे वाटावे म्हणन मी रामाला साकडे घातले आहे." ते हसून म्हणाले, "येवढेच ना ? बघ, मी उद्या खडखडीत बरा होऊन या व्यापातून सुटेन. माझ्यावर विश्वास ठेवून तू आता पोटभर जेव बघू !" अप्पांना आग्रह करून त्यांनी जेवायला घातले. रात्री नऊ वाजताच ते कीर्तनाला उभे राहिले. आणि निरूपणात इतके रंगून गेले की त्यांना देहकष्टाचा पूर्ण विसर झाला. आजच्या निरूपणात निर्वाणीचे अभंग होते. आपल्या जिवाभावाची शपथ घेऊन, श्रोत्यांना आर्जव-विनंत्या करून त्यांनी सांगितले की, "बाबांनो, आयुष्याची पैज कोणी लावू नये. संसार करताना तो नेकीने करा, पण तो देवाचा आहे म्हणून नीतीने व सदाचरणानें करा, आणि ही जाणीव राहण्यासाठी मुखानें अखंड रामनाम घ्या, की राम तुमचे कल्याण करील." निरूपण त्यांनी इतके आळवून सांगितले की त्यांचा प्रत्येक शब्द श्रोत्यांच्या हृदयाचा ठाव घेत होता व डोळे अतूट पाण्याने भरलेले होते. नंतर त्यांनी श्रीरामाच्या मूर्तीवर आपली अशी काही प्रेमविव्हळ दृष्टि खिळवली की त्याने सगुणप्रेमाचा जणु कळस बांधला. नंतर श्रोत्यांकडे बघून ते बोलले, "मी जन्म घेऊन रामरायाला माझ्या रोमरोमात भरून ठेवला. आता मी त्याच्यात विलीन होणार व माझी खात्री आहे की तो मला धोका देणार नाही. मी आपल्या चरणी नम्र होऊन आपली आज्ञा घेतो व आपली या दीन दासावर कृपा असावी येवढेच मागणे मागतो," हे शब्द ऐकताच श्रोत्यांचा जीव निखालस पिळवटून गेला. कीर्तनात रडता येईना आणि दुःख तर

समावेना; उठून जाण्यास शरीरही उचलेना! झाले. कीर्तन संपवताना त्यांनी रामनामाचा गजर करण्यास श्रोत्यांना सांगितले व नाम आपल्या हृदयात खोल कोरून ठेवण्यास विनंती केली. घड्याळात दिडाचा ठोका पडला. आरती झाली. सोमवार दि. २२ डिसेंबर ची पहाट लागली. श्रीमहाराज सिंहानावर टेकले होते. नेहमीप्रमाणें परगावची काही मंडळी दर्शनाला पुढे आली. श्रीमहाराजांना फार थकवा होता तरी ते त्यांच्याशी प्रसन्न मुद्रेने बोलून आशीर्वाद देत होते व रामनाम घेण्यास सांगत होते. एका बाईने अश्रु ढाळीतच त्यांच्या चरणावर डोके टेकले. श्रीमहाराज म्हणाले, "माय, असे का?" ती बोल्ली, "महाराज आपण एक दिवसातच जाणार ...!" तिला पुढे बोलू न देता ते म्हणाले, "माय, देव ठेवील तसे रहावे आणि त्याने बोलवले की लगेच आनंदाने जावे." नंतर सर्व मंडळीना त्यांनी झोपण्यास जाण्यास सांगितले व आपण खोलीत गेले. हरिपंत मास्तर, वामनराव ज्ञानेश्वरी, अम्मा अशी तीन-चार मंडळीं त्यांच्या खोलीत गेली. "मी जरा आडवा होतो" असे म्हणून ते उताणेच निजले. चेहरा शांत व प्रसन्न होता. चार वाजता ते डाव्या कुशीवर वळताना, "श्रीराम, श्रीराम," असे मंजुळ, पुलकित स्वरात बोलले. पाचच मिनिटांनी ते उठून बसले, मंडळीकडे पाहिले. सिद्धासनात त्यांनी समाधि लावली. त्यावेळी ते महायोग्यासारखे दिसत होते. सव्वा पाच वाजता समाधीतून उत्थापन होताच ते वामनरावांना म्हणाले, "वामनराव, आपण प्रातर्विधि उरकून घेऊ." हातपाय धुवून श्रीरामरायाला त्यांनी साष्टांग नमस्कार घातला व "माझ्या माणसांना संभाळ" असे रामाला जिव्हाळ्याने म्हटले. रामासमोरच सुगंधी उदबत्त्या लावून, रांगोळी काढून 'कुशोत्तरमृगाजिन' मांडले होते त्यावर बसण्यास ते आले व म्हणाले, "अम्मा, ही रामरायाची अखेरची सेवा बरं का!" आसनावर 'पाऊले' ठेवून उभे असतानाच वामनरावांनी चरणावर डोके ठेवले. आपला वरदहस्त ठेवून त्या प्रेमाच्या पुतळ्यांनीं, **"जेथे नाम तेथे माझे प्राण। ही सांभाळावी खूण ॥"** असा सर्वांनी आशीर्वाद दिला. नंतर त्यांनीं सिद्धासन घालून डोळे झाकले व सगळ्यांना रामनामाचा गजर करण्यास सांगितले. सोमवारचा पहिला वेळामुहूर्त 'अमृत' होण्यात असतो तो चालू होता. अशा दिव्य मुहूर्तावर महाकुंभक करून त्यांनी आपल्या प्राणांना ब्रह्मरंध्रांतून अनंतात विलीन होण्यास मोकळीक केली. हा काल स्पष्ट सूर्याचा उषःकालातून जात होता. व दिवस तिथिमानानें मार्गशीर्ष वद्य दशमी होता. जगाला कालमान परिमेय करवणारा भौतिक मित्र पहात आहे आणि हा गोंदवल्याचा अध्यात्ममित्र, श्रीगणेश, सगुण ॐकार, अपरिमेय अनंतात स्वस्वरूपी लीन होत आहे असा हा दिव्य योग होता. श्रीमहाराजांचा देह कलंडू लागला म्हणून वामनरावांनी त्यांना कुशीत धरले. नामस्मरण चालूच होते. जेरे मास्तरांनीं भाऊसाहेबांना घरी जाऊन बोलावले. त्यांनीं डॉ. जोशींना येण्यास गोठ्यावर निरोप दिला. दोघे मंदिरात पोचले त्याच्या आधींच श्रीमहाराजांनीं आपली प्राणज्योत जड देहातून

सूक्ष्मात घाडली होती. एकट्या भाऊसाहेबांनाच सोमवारचा दिवस कसा उजाडणार आहे याची स्पष्ट कल्पना होती, परंतु ज्या प्रसंगाची आठवण आज मितीसही पोटात कालवाकालव करते, तो प्रत्यक्ष पाहिला असता त्यांच्या मनाची काय अवस्था झाली असेल? श्रीमहाराजांच्या अंगात अजून उबारा होता म्हणून भाऊसाहेबांनी नाडी बघण्यास सांगितले. त्यांनी छाती व नाडी पाहून हातानेच 'सगळे संपले' असे दाखविल्यावर भाऊसाहेबांच्या डोक्याला समजले की, **ही समाधि नसून महा-समाधि आहे.** श्रीमहाराजांचे अंग सात वाजल्यानंतर थंड पडू लागले आणि दुःखाचा डोंब उसळला. श्रीरामरायाने प्रयाण केल्यावर अयोध्या जशी निष्प्रभ झाली तसेच गोंदवले झाले.

ज्या देहाने हजारों-लाखो अडाण्यांपासून तत्वज्ञानमार्तंडापर्यंत व अत्यंत दरिद्रयांपासून राजांपर्यंत भगवंताच्या नामाचे महत्त्व व त्याच्या प्रेमाचा महिमा पटवून नामस्मरणाचे भरघोस पीक अखंड भारतभर विखुरले, ज्या देहाने उदंड अन्नदान व द्रव्यदान करून अगणित आत्मे तृप्त केले, ज्या देहाने कितीतरी कुटुंबांचे संसार रामनामाच्या आधाराने सुखाचे केले व ज्या देहाने 'रामाचा दीन दास' म्हणवूनच भारतीयांची निर्लोभ सेवा आयुष्यभर केली, त्या देहाचे चैतन्य नाहीसे झाले !

श्रीमहाराजरूपी अध्यात्ममित्राच्या द्वादश कलांच्या रेखा साधेपणानें रेखाटून लोकशाही जगातील निधर्मी जनतेसमोर ठेवल्या आहेत व या कशा दिसतात हे सांगण्याचे कार्य त्यांनी करावयाचे आहे. शेवटी नाम–भक्तीचे देवे म्हणून ही पुष्पांजलि त्या विभूतीच्याच चरणकमली मी वाहात आहे.

नमोऽस्तु नामवेदाय नामदेवाय ते नमः ।
नमोऽस्तु नामहंसाय नामसिद्धाय ते नमः ॥ (समाप्त)

## साईभक्त कृष्णराव खोपकर यांचे निधन

मुंबई – रविवार – नायगाव – वडाळा विभागातील समाजवादी पक्षाचे एक प्रमुख कार्यकर्ते श्री. कृष्णराव विठ्ठल खोपकर यांचे प्रदीर्घ आजारानंतर नुकतेच निधन झाले. निधन समयी त्यांचे वय चोपन्न वर्षांचे होते.

श्री. खोपकर हे मुंबई कामगार मध्यवर्ती ग्राहक सहकारी मंडळाचे (अपना बाजार) व्यवस्थापक समितीचे सभासद व मुंबई कामगार नागरी सहकारी बँकेचे डायरेक्टर होते. नायगांव, वडाळा भाडेकरू संघ, साने गुरुजी बालविकास मंदीर, राष्ट्रीय जीवन विकास मंडळ, अखिल कोळी समाज परिषद इ. संस्थांशी त्यांचा अत्यंत जवळचा संबंध होता. ते ठाण्याच्या रॅप्टॅकॉस ब्रेट ॲण्ड कंपनीत गेली ३० वर्षे औषधी गोळ्या बनविणाऱ्या कॅलिसनॉल विभागाचे प्रमुख होते. कंपनीमधे होणाऱ्या वेगवेगळ्या कार्यात ते नेहमी उत्साहाने भाग घेत असत.

कै. खोपकर यांच्या मागे त्यांचे वयोवृद्ध आई-वडील, चार मुलगे, एक मुलगी, तीन बहिणी व दोन भाऊ असा मोठा परिवार आहे. ईश्वर मृतात्म्यास सद्गति देवो !

# श्री गजाननाची भूपाळी

गणाधीश गणपती, मांडिला पूजेचा सोहळा
भक्तिभाव अर्पून वाहतो, कमळांच्या माळा ...
सूर्योदय होतांच करूनिया सगळे स्नानाला
शुचिर्भूत निजमनी होऊनी जमती ध्यानाला
सोनेरी किरणांत नाहते सृष्टी तेजस्विनी
पक्षांचा किलबिलाट, कणकण, गुणगुणती गाणी
पंचामृत मध दुग्ध शर्करा, तूप दही आणी
नैवेद्यास्तव मोदकराशी, खिरापतींचा धनी
लाल लाल पाकळ्या केवडा, दुर्वा, गंधाक्षता
वाद्यवृंद, आरती निरांजन येते संपन्नता
उत्सव उत्साहांत साजरा मंगलमय वेळा
आरंभी तुमचीच प्रार्थना, ओंकाराच्या मूळा
भक्तिभाव अर्पून वाहतो ...... ॥ १ ॥

तुला स्थान अंतरी, तूं खरा जनतेचा राणा
कुणि ज्यांना म्हणतात 'दूर व्हा' (म्हणजे दुर्वा) जवळिसी तूं त्यांना
सर्व प्राणिमात्रांत एकता, गजमुख हे सांगे
मायां करिसी मूषकावरी भेदभाव भंगे
बारिक दृष्टी शोध घेतसे-सत्य जे बुडाशी
लांब कान-सोंडेने हूं रे-हृदयाला स्पर्शी
केवळ स्मरती संकटसमयी जे जे देवाला
रक्षण त्यांचे करण्यासाठी देव नसे बांधिला
लोकमान्यतेचाच लाविला टिळकांनी तुज टिळा
नित्य दर्शनी एकतानता, जन होती गोळा
भक्तिभाव अर्पून वाहतो ...... ॥ २ ॥
गणाधीश मोरया मांडिला पूजेचा सोहळा
भक्तिभाव अर्पून वाहतो, कमळांचा माळा
गणाधीश मोरया, मोरया, मोरया, मोरयाऽऽ......

— शशिकांत पाळंदे

# गुरुपौर्णिमा उत्सव – जुलै १९७४

या महिन्यात श्रीसाईमहाराजांच्या उत्सवाप्रित्यर्थ शिरडी दरबारी चिक्कार गर्दी उसळली होती. हा गुरुपौर्णिमा उत्सव दि. ३–७–७४ ते दि. ५–७–७४ पर्यंत तीन दिवस श्रींच्या समाधि मंदिरात मोठ्या थाटात साजरा झाला. नामांकित कलाकार डॉ. वसंतराव देशपांडे पुणे, कु. प्रभाताई अत्रे मुंबई, श्री. नरवडे भजन मंडळ कोपरगाव, श्री. मुल्हेरकरबुवा नासिक यांना कार्यक्रमासाठी निमंत्रित केले होते. शिवाय बऱ्याच कलाकारांनी आपल्या कलेच्या हजेऱ्या श्रींच्या पुढे दिल्या. उत्सवाचा १ ला दिवस:— बुधवार दि. ३–७–७४ रोजी पहाटे ४ वा. मंदिर उघडले. ५–१५ वा. काकड आरती झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरुस्थान मार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय–वाचनास सुरुवात झाली. श्रींचे मंगलस्नान, अभिषेक पूजा, माध्यान्ह आरती, नित्य कार्यक्रम झाल्यावर दुपारी ४–३० ते सायंकाळी ६–३० पर्यंत श्री. मुल्हेरकरबुवा नासिक यांचे कीर्तन झाले. धूपारती नंतर रात्री ७–३० ते ११ पर्यंत कु. प्रभाताई अत्रे मुंबई यांचे गायन झाले. रात्री ९–१५ ते ११–२५ पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून आल्यावर शेजारती झाली.

उत्सवाचा मुख्य दिवस:— गुरुवार दि. ४–७–७४ पहाटे मंदिर उघडल्यापासूनच श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी झाली. सकाळी ५–३० वा. काकड आरती झाली. सकाळी ६–३० श्रींच्या साईसच्चरित्र अध्याय वाचून ग्रंथाची समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून, गुरुस्थान मार्गे समाधि मंदिरात आली. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान झाले. नित्य कार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ४–३० ते सायंकाळी ६–३० पर्यंत श्री. मुल्हेरकरबुवा यांचे कीर्तन झाले. रात्री ७–३० ते ११ पर्यंत डॉ. वसंतराव देशपांडे पुणे यांचे गायन झाले. रात्रौ ९–१५ ला श्रींच्या रथाची मिरवणूक वाद्यांच्या गजरात समाधि मंदिरातून निघाली. राहाता व श्री साईनाथ माध्यामिक विद्यालय शिर्डी यांची बॅण्डपथके, सनई, चौघडा, शिंगवादन, डफ, ढोल यांचे वादनात व साईभक्त कोळी लोक व इतर भक्तांचे भजन, गायन, नाच अशा थाटात मिरवणूक भोजनगृहाजवळ आली. त्या ठिकाणी ग्रामस्थ लोकांनी भारुड, गारुड कार्यक्रम केले व पुण्यातील प्रसिद्ध नकलाकार श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर यांनी निरनिराळे वेष धारण करून सर्वांची करमणूक केली. त्यानंतर मिरवणूक मंदिरात आली व उपस्थित कलाकारांच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.

उत्सवाचा ३ रा दिवस :- शुक्रवार दि. ५-७-७४ रोजी सकाळी ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. सामुदायिक अभिषेक झाल्यावर सकाळी १० ते दुपारी १२ पर्यंत काला कीर्तन दहीहंडी कार्यक्रम झाला व माध्यान्ह आरती झाल्यावर भक्तांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्री ७-३० ते १० वाजेपर्यंत श्री. नरवडे भजन मंडळी कोपरगाव यांच्या भजनाचा कार्यक्रम होऊन शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला. कोर्ट रिसीव्हर माननीय श्री. का. सी. पाठकसाहेब हे सर्व कार्यक्रमास उपस्थीत होते व सर्व कार्यक्रम व्यवस्थित पार पडण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन केले.

दोन कलाकारांचा सत्कार :-श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे, हे नित्य नेमाने श्रीसाईबाबांचे उत्सवास येऊन नकलांचे कार्यक्रम करित असतात त्यांचे चालू गुरुपौर्णिमा उत्सवात ५० कार्यक्रम पूर्ण झाले व श्री. राजाभाऊ देशपांडे पुणे पेटीवादनकार व गायक, पुणे, यांनी सतत ३२ वर्षे उत्सवास उपस्थित राहून कलारूपाने श्रींची सेवा करीत आहेत. या दोन्ही कलाकारांना माननीय श्री. पाठकसाहेब यांनी संस्थानतर्फे शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला.

**माननियांच्या भेटी :**

( १ ) मा. श्री. मोहनलाल सुखाडिया, राज्यपाल कर्नाटक राज्य, म्हैसूर. (२) मा. श्री. आर. जी. साळवी ( निवृत्त ) आय. ए. एस., मुंबई. ( ३ ) मा. श्री. एम्. डी. कांबळी, डिस्ट्रीक्ट ॲण्ड सेशन जज्ज, ठाणे. ( ४ ) मा. ले. जनरल श्री. सरताज सिंग, जनरल ऑफिसर कमांडिंग इन चीफ सदर्न कमांड, पुणे. ( ५ ) मा. श्री. ए. एन. बटव्याल आय. ए. एस., ॲडि-कमिशन मुंबई विभाग, मुंबई. ( ६ ) मा. डॉ. एम्. एन्. देसाई, कमिशनर आ. I. A. S., मुंबई विभाग, मुंबई.

हवापाणी : शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली त्यांची नावे खालील प्रमाणे :—

कीर्तन :—( १ ) श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमी-प्रमाणे झाली. ( २ ) ह. भ. प. विष्णू दामोदरबुवा ताहराबादकर जि. अहमदनगर. ( ३ ) ह. भ. प. छबू महाराज मुल्हेरकर, जि. नाशिक. ( ४ ) ह. भ. प. सौ. कमला-बाई रत्नपारखी, जि. अकोला. ( ५ ) ह. भ. प. सौ. वत्सलाबाई का. पवार, श्रीरामपूर. ( ६ ) ह. भ. प. किसन शंकरराव अंभोडे, औरंगाबाद. ( ७ ) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिरडी.

प्रवचन :—(१) श्रीसंत सुभाषबाबा, अकोला यांचे प्रवचन झाले.

भजन :—(१) श्री. बाबूराव अ. नरोडे भजन मंडळ, कोपरगाव. (२) श्री. साईनाथ भजनी मंडळी, पुणे. (३) कै. तुकडोजी महाराज भजनी मंडळ, गुरुकुंज आश्रम, अमरावती. (४) ह. भ. प. खेडलेकर भजनी मंडळ, जि. नाशिक. (५) ह. भ. प. मंजूर भजनी मंडळ, ता. कोपरगाव. (६) भगवान सत्यसाई सेवा समिती भजन मंडळ, वरळी, मुंबई. (७) अशोक नगर भजनी मंडळ, अ. नगर.

गायन, तबला, पेटी, सनईवादन :—(१) कु. प्रभाताई अत्रे, मुंबई. (२) डॉ. वसंतराव देशपांडे, पुणे. (३) श्री. सोनवणे, पुणे. (४) श्री. खेमकर, मुंबई. (५) श्री. आप्पासाहेब जळगांवकर. (६) श्री. इनामदार. (७) श्री. म्हाळगी, पुणे. (८) श्री. रामचंद्र पवार (९) श्री. प्रकाश पवार (१०) उदयसिंग ठाकोर (११) श्री. हरीभाऊ जाधव (१२) श्री. प्रमोद नातू (१३) राजेंद्र रजपूत (१४) श्री. पांवगे (१५) श्री. नगिने, श्रीसाईनाथ भजन मंडळ, पुणे. (१६) श्री. सदाशिवराव जाधव, सांगली. (१७) श्री. अरविंद च. गाडगीळ, पुणे. (१८) श्री. माधव दैठणकर पुणे. (१९) श्री. तुकाराम म. दैठणकर पुणे. (२०) श्री. राजकुमार बार्शिकर नगर. (२१) श्री. रघुनाथ बा. सांडभोर, पुणे. (२२) श्री. के. के. दुगड नगर. (२३) श्री. मुरलीधर गायकवाड नगर. (२४) श्री. भोलानाथ समेळ मुंबई. (२५) श्री. अरविंद प्रा. चिंचकर पुणे. (२६) श्रीपाद मा. कुलकर्णी. (२७) श्री. किनीकर श्रीरामपूर. (२८) श्री. पांडोबा गुरव श्रीरामपूर (२९) श्री. राजाभाऊ देशपांडे पुणे. (३०) श्रीमती शुभलक्ष्मीबाई थत्ते श्रीरामपूर. (३१) तरटे प्रतिभा विश्वनाथ श्रीरामपूर. (३२) थत्ते पद्मजा ना. श्रीरामपूर (३३) अरुणा बा. देशपांडे श्रीरामपूर. (३४) श्री. दिगंबरराव भातुडे श्रीरामपूर. (३५) श्री. नामदेव ग. शिंदे श्रीरामपूर (३६) श्री. सातर्डेकर श्रीराम विष्णु मुंबई (३७) श्री. नारकर दिगंबर बा. मुंबई (३८) श्री. जी. पी. श्रीनिवासराव कानपूर. (३९) श्री. नामदेवराव द. ज. पुणे. (४०) श्री. शिवाजी तु. धुमाळ पुणे. (४१) श्री. पांडुरंग लाखे पुणे. (४२) श्री. बाळाजी पी. गुरव शिर्डी. (४३) श्री. राजेश्वर शं. देशमुख अमरावती. (४४) श्री. शंकर रा. सालकर कोपरगाव. (४५) श्री. शामसुंदर भेडा संगमनेर. (४६) श्री. शिवराम बिडवे संगमनेर. (४७) श्री. दिनानाथ कोते संगमनेर. (४८) श्री. मुरलीधर गायकवाड नगर (४९) श्री. ज्ञानोबा ता. वाडेकर शिर्डी (५०) श्री. मनोहर ह. लोणकर पुणे. (५१) श्री. सुरेश स. लोणकर पुणे. (५२) श्री. चंद्रकांत शा. लोणकर पुणे. (५३) श्री. ज्ञानेश्वर रा. वैद्य शिर्डी. (५४) श्री. अहमद पठाण सावळाविर. (५५) श्री. आदिनाथ मुईगला लक्ष्मीवाडी. (५६) श्री. पुंडाजी द. वाघ येवला, (५७) श्री. किशोर नि. वाघ येवला. (५८) श्री. वसंतराव देवळणकर पुणे. (५९) श्री. जगन्नाथ न. जाधव पुणे. (६०) श्री. दिलीप बा. जाधव कल्याण. (६१) श्री. आनंदराव के. आढाव कोपरगाव (६२) श्री. शिवराम खंडागळे. (६३) श्री. वसंत मु. भावसार. (६४) श्री. चांगदेव शि. वाघ. (६५) श्री. दिलीप ज. पांडे (६६) श्री. भागवतराव काळवाघे (६७) श्री. आण्णासाहेब बा. आहेर कोपरगाव (६८) श्री. स्वामी रामानंद बेळगाव. (६९) डॉ. बाबासाहेब तायडे अकोला (७०) श्री. बाबूराव बा. बिडवे संगमनेर (७१) श्री. रघुनाथ सो. वाघमारे. पंढरपूर (७२) श्री. शाळीग्राम रत्नपारखी अकोला. (७३) बद्रीनारायण शर्मा हैद्राबाद (७४) श्री. बाबासाहेब माळवदकर पुणे.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडीची प्रकाशनें

श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सच्चरित ( मराठी ) | रु. | ८-०० |
| २. | श्री साई सच्चरित ( इंग्रजी ) | रु. | ५-०० |
| ३. | श्री साई सच्चरित ( गुजराती ) | रु. | ४-५० |
| ४. | श्री साई सच्चरित ( हिंदी ) | रु. | ४-२५ |
| ५. | श्री साई सच्चरित ( कानडी ) | रु. | ४-२५ |
| ६. | श्री साईबाबा जीवितचरित्रम् ( तेलगू ) | रु. | ८-०० |
| ७. | श्री साईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि ( मराठी ) | रु. | ०-२० |
| ८. | दासगणूकृत ४ अध्याय ( मराठी ) | रु. | ०-२५ |
| ९. | सगुणोपासना ( मराठी किंवा गुजराती ) | रु. | ०-२० |
| १०. | श्री प्रधानकृत चरित्र ( इंग्रजी ) | रु. | १-०० |
| ११. | श्री साईलीलामृत ( मराठी ) | रु. | २-०० |
| १२. | श्री साईलीलामृत ( हिंदी ) | रु. | २-५० |
| १३. | सचित्र साईबाबा | रु. | १-०० |
| १४. | शीलधी ( मराठी ) | रु. | ०-२० |
| १५. | साईबाबा : अवतार कार्य ( अ. य. धोंड ) | रु. | १-७५ |
| १६. | शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा आल्बम ) | रु. | २-०० |
| १७. | श्री साईलीला मासिक ( मराठी किंवा इंग्रजी ) | | |
| | प्रत्येकी वार्षिक वर्गणी | रु. | ६-०० |
| | " किरकोळ अंकास– | रु. | ०-६० |
| १८. | मुलांचे साईबाबा ( द. दि. परचुरे ) ( मराठी ) | रु. | ०-५० |
| १९. | गुजराथी पोथी ( शरणानंद ) | रु. | ५-५० |

☆

**वरील प्रकाशनें मिळण्याची ठिकाणें :—**

१. व्यवस्थापक, श्रीसाईबाबा संस्थान, पोस्ट शिरडी, जिल्हा अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, पिन :–४०० ०१४.

Regd. No. MH/BYE/26

# तीन रंगी आशीर्वाद फोटो



| आकार | किंमत | आकार | किंमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १–५० | ८" × १०" | रु. ०–५० |
| १०" × १४" | रु. १–०० | २½" × ३½" | रु. ०–२० |
| ४½" × ५½" | रु. ०–३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. **डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉक्सवरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी.) | किंमत |
|---|---|---|---|
| १. शिळेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १–५० |
| २. शिळेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | ,, ,, | १–२५ |
| ३. शिळेवर बसलेले बाबा | ,, | २२.८६ × ३३.०२ | ०–५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | ,, ,, | ०–५० |
| ५. शिरडी दर्शन (६६ फोटोंचा अल्बम) | | | २–०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुं. नं. १४

मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि.
४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई–३१.
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक**, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई–१४.